दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com   epaper.lokrakshanay.com   dainiklokrakshanay@gmail.com   + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ   ●वर्ष-०१,अंक-३००   ●पृष्ठे-०४   ●ठाणे, शनिवार, २० एप्रिल २०२४   ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118   ●रु.२/-



## 'रातोरात पाडलेले गाळे तितक्याच वेगानं पुन्हा बांधून द्या...'

### मुंबई महापालिकेला मुंबई उच्च न्यायालयाचे कठोर आदेश

■ **मुंबई, यश सावंत :**
मुंबई महापालिकेने कुर्ल्यात एका बांधकामावर केलेल्या कारवाईवरुन मुंबई हायकोर्टाने ताशेरे ओढले आहेत. कुर्ला परिसरातील भारत कोल कंपाऊंड येथील काही गाळे महापालिकेने कारवाई करत जमीनदोस्त केले. मात्र या कारवाईविरोधात आता मुंबई हायकोर्टाने महापालिकेला फटकारत गाळे पुन्हा बांधण्यास सांगितले आहे. रातोरात पाडलेले गाळे तितक्याच वेगानं पुन्हा बांधून द्या, असे आदेश हायकोर्टानं दिले आहेत. यासोबत मुंबई महापालिकेच्या मनमानी कारवाईवर संतप्त झालेल्या हायकोर्टाचे खडेबोल देखील सुनावले आहेत.

मुंबई महापालिकेने ६ एप्रिल रोजी कुर्ला (पश्चिम) येथील भारत कोल कंपाऊंड येथे असणारे १३ औद्योगिक गाळे पाडले होते. गाळ्यांच्या मालकांनी या पाडकामाच्या विरोधात विनंती करूनही बांधकामांना अनधिकृत ठरवत महापालिकेने कारवाई केली होती. या औद्योगिक वसाहतीत १०० हून अधिक युनिट्स आहेत आणि सुमारे ५,००० कामगार काम करतात. पालिकेने पाठवलेल्या नोटीसवर ओम इंजिनीअरिंग वर्क यांच्यासह अन्य गाळे मालकांनी ॲड. बिपीन जोशी यांच्यामार्फत ही याचिका केली होती. मात्र याचिका प्रलंबित असताना महापालिकेने कारवाई केली. त्याप्रकरणी सुनावणी घेत कोर्टाने महापालिकेला पाडलेले १३ गाळे सोमवारपर्यंत पुन्हा बांधून देण्यास सांगितले आहे.

भारत कोल कंपाऊंडमधीले १३ गाळ्यांजवळ बेकायदा बांधकाम केल्याची नोटीस पालिकेने पाठवली होती. तसेच हे बांधकाम तोडण्याचा इशाराही पालिकेने दिला होता. त्यावर गाळेमालकांनी आक्षेप घेतला. या बांधकामाची सर्व कागदपत्रे असून त्याच्या १९६२ पासूनच्या नोंदी आहेत. तरीही महापालिका कारवाई करत आहे. त्यामुळे कारवाईची नोटीस रद्द करावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. ही याचिका प्रलंबित असतानाच पालिकेने या गाळ्यांवर कारवाई केली. यामुळे सुनावणीदरम्यान हायकोटार्ने पालिकेवर संतप्त होत एवढ्या घाईघाईत कारवाई करण्याची काय गरज होती, असा सवाल केला. गाळेधारकांकडून वरिष्ठ वकील जनक द्वारकादास व ॲड. चिराग कामदार यांनी युक्तिवाद केला. वरिष्ठवकील शैलेश शाह यांनी पालिकेची बाजू मांडली.

न्यायमूर्ती गौतम पटेल व न्यायमूर्ती कमल खाथा यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले आहेत. ''पालिकेविरोधात अशा अनेक याचिका दाखल होतात. कारवाईला अंतरिम स्थगिती देऊन न्यायालय पुढील सुनावणी घेतं. पण दिलेले अंतरिम आदेश वर्षानुवर्षे तसेच कायम राहतात. भारत कोल कंपाउंडमधील गाळे मालकांनी केलेल्या या याचिकेत कोणतेही अंतरिम आदेश दिले नाहीत म्हणून पालिकेनं रातोरात हे गाळे पाडले. पालिका अशाप्रकारे कारवाई करत असेल तर न्यायालय बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही. ही कारवाई करणाऱ्या पालिका अधिकाऱ्यांना कुणीतरी जाब विचारायला हवा,'' अशा शब्दात कोर्टाने महापालिकेचे कान उपटले.

दरम्यान, हे गाळे जुने असून अधिकृत असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता. ''पण आता ते बेकायदा आहेत की नाही याची शहानिशा करण्यासाठी एखाद्या आर्किटेकला तिथे पाठवल्यास आता त्यांच्या हाती काहीच लागणार नाही. पालिकेनं गाळ्यांवर बुलडोझर फिरवून गाळेधारकांचे पुरावेच नष्ट केलेत. या गाळ्यांची सीमा काय होती?, काही अतिरिक्त बांधकाम होते का?, याची काहीच माहिती आता मिळू शकणार नाही,'' असे हायकोर्टानं म्हटलं आहे.

## वाढवण बंदराविरोधातील याचिका हायकोर्टाने फेटाळल्या



■ **पालघर, रोहित जैसवाल :**
जिह्यातील वाढवण बंदर प्रकल्पाला विरोध करणाऱ्या याचिका उच्च न्यायालयाने फेटाळल्या. मागील २८ वर्षांपासून स्थानिक लोक या प्रकल्पाला विरोध करीत आहेत. तथापि, नवीन बंदर बांधण्यासाठी डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरणाने संबंधित बाबी विचारात घेत 'एनओसी' दिली आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. महाराष्ट्र राज्य सागरी मंडळ आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण या दोन संस्थांनी डहाणूजवळ वाढवणमध्ये नवीन बंदर उभारण्याची योजना बनवली आहे. यासाठी डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरणाने 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) दिले. त्यानंतर पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने तज्ञ मूल्यांकन समितीच्या शिफारशींच्या आधारे पर्यावरण आणि किनारपट्टी नियमन क्षेत्र मंजुरी दिली. मात्र स्थानिक लोकांचा असलेला विरोध लक्षात घेत कन्झर्व्हेशन ॲक्शन ट्रस्ट, पर्यावरणवादी देबी गोएंका यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. तसेच नॅशनल फिश वर्कर्स फोरमने रिट याचिका दाखल केली. या याचिकांवर न्यायमूर्ती अतुल चांदुरकर आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. सर्व युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खंडपीठाने याचिका फेटाळल्या.

## मतदानासाठी सदस्यांत जनजागृती करा सिडकोचे गृहनिर्माण सोसायट्यांना आवाहन




■ **नवी मुंबई, भावना जैन:**
लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली. त्यादृष्टीने मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी निवडणूक आयोगाच्या माध्यमातून विविधस्तरावर प्रयास केले जात आहेत. शासकीय संस्थांना यात सक्रिय भूमिका घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सिडको महामंडळानेसुद्धा मतदार जनजागृतीसाठी कंबर कसली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व नोंदणीकृत गृहनिर्माण सोसायट्यांना आपल्या सदस्यांत मतदानाविषयी जनजागृती करण्याचे आवाहन केले आहे. लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी शासकीय पातळीवरून सर्वंकष प्रयास सुरू आहे.

सिडकोचे कार्यक्षेत्रातील ठाणे आणि मावळ लोकसभा मतदारसंघात अनुक्रमे ७ मे आणि २० मे रोजी मतदान होणार आहे. त्यादृष्टीने संबंधित शासकीय यंत्रणा कामाला लागल्या आहेत. विशेषतः मतदानाविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती केली जात आहे. नवी मुंबईसह पनवेल महापालिका आणि उरण नगरपालिका परिसरात जवळपास पाच हजार नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था आहेत. त्याचप्रमाणे नोंदणी न झालेल्या गृहनिर्माण सोसायटींची संख्याही तितकीच मोठी आहे. या सर्व गृहनिर्माण सोसायट्यांतील सदस्यांत मतदानाविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने सिडकोने कंबर कसली आहे. तशा आशयाचे पत्र संबंधित गृहनिर्माण सोसायट्यांचे पदाधिकारी आणि कार्यकारी सदस्यांना दिले आहे. मतदानाविषयी जनजागृती करण्यासाठी संस्थेच्या आवारात निवडणुकीविषयक सूचना प्रसिद्ध कराव्यात. तसेच भित्तीपत्रके, समाजमाध्यमांद्वारे जनजागृती करावी, असे आवाहन सिडकोने केले आहे.

## सुप्रिया सुळे यांनी शरद पवार यांच्या हस्ते नारळ फोडत प्रचाराला केली सुरुवात



■ **बारामती, विशाल पाटील:**
अवघ्या देशाचे लक्ष बारामती मतदारसंघाकडे लागले आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या टप्प्यातील मतदानाची प्रक्रिया सुरू झाली आहे. यातच महाविकास आघाडी आणि महायुतीचे उमेदवार अर्ज भरत आहेत. महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सुनेत्रा पवार आणि महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळे रिंगणात आहेत. यातच अर्ज भरल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी शरद पवारांच्या उपस्थितीत प्रचाराला सुरुवात केली.

सुप्रिया सुळे यांनी शरद पवार यांच्या उपस्थितीत प्रचाराचा नारळ फोडला. बारामती मधील कन्हेरी मारुती मंदिरात नारळ फोडून प्रचाराला सुरुवात करण्यात आली. १९६७ पासून या मंदिरात नारळ फोडून प्रचाराला सुरुवात करण्याची पवार कुटुंबीयांची परंपरा आहे. यावेळी शरद पवार यांच्यासह युगेंद्र पवार, रोहित पवार, सुनंदा पवार, राजेंद्र पवार असे पवार कुटुंबीय आवर्जून उपस्थित होते.

१९६७ पासून मारुती मंदिरात प्रचाराचा नारळ फोडला जातो. शरद पवारांना बारामतीकरांनी सहा दशके साथ दिल्याबाबत त्यांचे आभार आहेत, असे सांगत दुष्काळ जाऊन शेतकरी वर्गाचे चांगले दिवस येऊ दे, असे साकडे घातल्याची माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली. लोकशाही आहे. परंतु, पारदर्शकपणे निवडणुका व्हाव्यात हीच निवडणूक आयोगाला विनंती आहे, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. तसेच विरोधकांनी केलेल्या टीकेवर बोलताना, माझे कुठल्याही विधानाला एकच म्हणणे आहे, राम कृष्ण हरी वाजवा तुतारी, असा टोला सुप्रिया सुळे यांनी लगावला.

## पिण्याच्या पाण्यात नाल्याचे पाणी... नागरिकांचे आरोग्य धोक्यात

■ **उल्हासनगर, दिगंबर जाधव :**
सुभाष टेकडी परिसरातील अनेक भागात पाणी सोडण्याची वेळ ही निश्चित नसल्याने नागरिकांना आणि विशेषतः महिलांवर जागता पहारा करण्याची वेळ येत आहे. या भागातील अनेक समाजसेवक हे मासमीडियावर पाण्याची वेळ व्हायरल करत असल्याने त्यानुसार झोपमोड करून नागरिकांना पाण्याची प्रतिक्षाकरावी लागत आहे. याबाबत अनेकदा आंदोलने करण्यात आली असताना अधिकाऱ्यांना एकदाची पाण्याची वेळ निश्चित का करता येत नाही हा संशोधनाचा विषय बनला आहे. काही दिवसांपूर्वीच ड्रेनेजचे खोदकाम करताना पाण्याची लाईन तुटल्याने आठवडाभर नागरिकांचा घसा कोरडा राहिला होता. नागरिकांनी आंदोलन केल्यावर अतिरिक्त



आयुक्त जमीर लेंगरेकर, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता परमेश्वर बुडगे यांनी त्या स्पॉटची पाहणी करून लाईन दुरुस्त केली होती.

आता गेल्या तीन दिवसांपासून दहा चाळ नालंदा शाळे जवळील नागरिकांना पिण्याच्या पाण्यामध्ये नालीचे पाणी येत आहे. या पाण्याचा प्रचंड प्रमाणात वास येत असून नागरिकांनी हे पाणी प्यायचे कसे? असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे. सतीश किराणा स्टोर जवळ काही लोकांनी नाली मध्ये पाण्याची लाईन घेतली असून अधिकारी वर्ग तक्रार करूनही लक्ष देत नसून त्याचा परिणाम नागरिकांना भोगावा लागत आहे. तसेच काही ठिकाणी येणाऱ्या पाण्यात बारीक खडी येत आहेत. अत्यावश्यक सेवा असूनही अधिकारी वर्ग लक्ष देत नसून कुठलीही तपासणी केली जात नसल्याची खंत आहे. पिण्याच्या पाण्याच्या येणारे नालीचे पाणी बॉटल्स मध्ये भरून महानगरपालिकेत उपअभियंता आर.एन.ठाकरे यांना दाखवल्यावर हे पाणी कनिष्ठ अभियंता हरेश मिरकुटे यांच्या सुपूर्द केले आहे. त्यावर तात्काळ उपाययोजना करण्यात येणार असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले आहे.

## रस्त्यावर झाडांखाली कार पार्किंग करणाऱ्यांसाठी पालिकेने घेतला 'हा' निर्णय



■ **मुंबई विशेष प्रतिनिधी:**
पावसाळा सुरू होण्यापूर्वी खबरदारी म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने मोठ्या आणि धोकादायक ठरू शकणाऱ्या झाडांच्या फांद्या सुयोग्य आणि शास्त्रीय पद्धतीने छाटणीची कामं हाती घेतली आहेत. मात्र या कामांमध्ये रस्त्याच्या कडेला लावलेल्या वाहनांचा अडथळा येत आहे. महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयांकडून त्या-त्या परिसरातील झाडांच्या छाटणीबाबत आधीच कळवण्यात येतं. तसंच या कार्यवाहीत प्रशासनाला सहकार्य करून आपापली वाहने अशा ठिकाणांहून काढून घ्यावीत, असं आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे. झाडांच्या फांद्या छाटणीदरम्यान जर दुर्दैवाने वाहनांचे नुकसान झाले, तर महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही, असं प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. मुंबई महानगरात सर्व्हेक्षण केल्यानंतर धोकादायक झाडांच्या फांद्या छाटणीचं उद्यान विभागाकडून सुरू आहे. मात्र ही छाटणी सुरू असताना रस्त्याच्या कडेला लावलेल्या वाहनांचा अडथळा येत आहे. वाहनांचे नुकसान होवू नये म्हणून महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयाकडून त्या-त्या परिसरातील झाडांच्या छाटणीबाबत आधी कळवण्यात येतं. त्यामुळे निश्चित केलेल्या वेळेनुसार आपापली वाहने संबंधित ठिकाणाहून काढून सुरक्षित अशा अन्य ठिकाणी न्यावीत. प्रशासनाने आवाहन करूनही जर नागरिकांनी संबंधित ठिकाणांहून वाहने काढली नाहीत आणि फांद्या छाटणीदरम्यान दुर्दैवाने वाहनांचे नुकसान झाले तर महानगगरपालिका प्रशासन त्यास जबाबदार राहणार नाही, असे स्पष्ट करण्यात आलं आहे.




## वातावरणातील बदलाचा माथेरानच्या पर्यटनाला फटका; उच्चांकी तापमानाची नोंद

■ **माथेरान, नितीन देवळेकर :**
थंड हवेचे ठिकाण असलेले माथेरान गेल्या काही दिवसांपासून अधिक तापू लागले आहे. मंगळवारी पारा ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला होता. त्यामुळे चिंता व्यक्त होत आहे. एप्रिल, मे महिन्यात राज्यात बहुतांश भागात तापमानाचा पारा वाढत असला तरी माथेरान थंड राहते, अशी ख्याती होती. परंतु आता त्यामध्ये बदल होऊ लागला आहे. मंगळवारी उच्चांकी तापमानाची नोंद केली असून अनेक वर्षानंतर पहिल्यांदाच कमाल तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसपर्यंत गेल्याने येथील पर्यटनाबाबतच चिंता निर्माण झाली आहे. थंड हवेच्या ठिकाणी तापमान वाढ होत असेल तर येथे येणाऱ्या पर्यटकांचा ओढा आपसूकच कमी होणार आहे. त्यामुळे माथेरानच्या पर्यटनासाठी ही धोक्याची घंटा आहे, असे समजण्यात येते. वातावरणातील बदलाचा फटका माथेरानच्या पर्यटनाला बसत आहे. येथे थंड हवेसाठी येणाऱ्या पर्यटकांना या बदलाला सामोरे जावे लागत असून त्याचा निश्चितच विपरीत परिणाम येथील व्यवसायावर होणार आहे. दुपारनंतर येथील वातावरणामध्ये कमालीचा बदल घडत असून ढगाळ वातावरणामुळे येथे गर्मी वाढताना दिसते. सायंकाळी मात्र थंड हवा सुटल्याने नागरिकांना दिलासा मिळतो, असे स्थानिक नागरिकांनी सांगितले. दरम्यान, गुरुवारी तापमानाचा पारा ३२ अंश सेल्सिअसपर्यंत होता. त्यामुळे काहीसा दिलासा मिळाला. मात्र, बाजारपेठेत दुपारी शुकशुकाट होता.

## 'गोखले'पुलाच्या कामांकडे पालिकेचे दुर्लक्ष आयुक्तांकडे नागरिकांच्या तक्रारी

■ **मुंबई, विशाल कारंडे :**
गोखले आणि बर्फीवाला पुलाच्या जोडणीत पालिकेकडून झालेल्या गोंधळाच्या चौकशीचे संकेत पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत. मात्र, हा गोंधळ केवळ पुलाच्या जोडणीपुरता असला तरी पुलाच्या पुनर्बांधकामामध्ये इतरही अनेक बाबींची अद्याप पूर्तता झाली नसल्याची टीका काही सामाजिक संस्था आणि स्थानिक रहिवाशांनी केली आहे. पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना स्थानिकांनी पत्र लिहून त्यांनी गोखले पुलाचा पदपथ, गोखले पूल ते तेली गल्लीपर्यंतचा मार्ग, अंधेरी पूर्वेचा स्कायवॉक अशा अनेक मुद्यांवर काम करण्याची गरज व्यक्त केली आहे. व्हीजेटीआय आणि बर्फीवाला जंक्शनवर उपयोगिता सेवा कशा आणि कुठे असणार याचा कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे त्याची तपशीलवार माहिती पालिकेने स्थानिकांना द्यावी, अशी मागणी झोरू बाथेना यांनी आयुक्तांकडे



केली आहे. याशिवाय गोखले रेल्वे पुलावर बांधलेल्या पदपथावर एकाच वेळी २ माणसे चालणेही अशक्य होते, इतका तो अरुंद असल्याचेही पत्रात नमूद आहे. गोखले पुलाच्या पश्चिमेला पादचाऱ्यांसाठी सरकत्या जिन्याची सोय पालिकेकडून करण्यात येणार होती. मात्र, अद्याप त्याच्या बांधणीला सुरुवातच नसल्याचे बाथेना यांनी नमूद केले आहे. गोखले पुलाच्या एका मार्गिकेचे काम पूर्ण झाले असले तरी अद्याप दुसऱ्या मार्गासाठी आवश्यक गर्डरचे काम सुरू झालेले नाही, त्यामुळे स्थानिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. पुलाची देखरेख व कामाच्या नियंत्रणासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची लवकरात लवकर नियुक्ती करावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

## वेळेत बदल पण कामात हलगर्जीपणा नको! पालिका आयुक्तांची स्वच्छता कर्मचाऱ्यांना तंबी

■ **नाशिक, सचिन कदम:**
शहर व परिसरातील वाढत्या तापमानामुळे स्वच्छता विभागातील कामगारांच्या कामकाजाच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने कामगारांनी वेळेत आवश्यकतेनुसार सकाळी ५ ते दुपारी १२ असा बदल करावा. या वेळेतच काम पूर्ण करून घ्यावे. यामुळे उष्णतेचा त्रास जाणवणार नाही. सकाळी गटार साफ केल्यानंतर सायंकाळी पाचनंतरच कचरा उचलावा अशा सूचना देतानाच स्वच्छतेच्या कामात हलगर्जीपणा केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा आयुक्त रवींद्र जाधव यांनी गुरुवारी मनपा सभागृहात झालेल्या बैठकीत दिला. महानगरपालिकेच्या स्वच्छता व मलेरिया विभागाकडील मुकादम, स्वच्छता निरीक्षक यांची बैठक मनपा सभागृहात श्री. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी ते बोलत होते. श्री. जाधव म्हणाले, शहरात दैनंदिन स्वच्छतेबाबतच्या तक्रारींमध्ये सातत्याने वाढ होत आहे. २२



एप्रिलपासून विशेष स्वच्छता मोहीम राबवून गटार साफ करावी. गटारीतील कचरा उन्हाच्या वेळी न उचलता सायंकाळी पाचनंतर कचरा उचलावा. झाडू कामगारांनी देखील सकाळच्या सत्रात कामकाज पूर्ण करावे. दुसऱ्या दिवसाचे कामाचे नियोजन आदल्या दिवशीच करावे. कोणत्याही परिस्थितीत स्वच्छतेबाबत तक्रार येणार नाही याची काळजी घ्यावी. गटारावरील अतिक्रमण तातडीने काढावे. स्वच्छतेच्या कामात अतिक्रमण अडथळा ठरणार नाही याची काळजी संबंधित विभागाने घ्यावी. मलेरिया विभागाने औषध फवारणी, धुरळणी या कामासाठी सकाळ, संध्याकाळच्या सत्रात नियोजन करावे. डास प्रतिबंधक उपाययोजना करावी. कामकाजात कोणत्याही कामगार, मुकादम, स्वच्छता निरीक्षक यांनी बेजबाबदार वर्तन व हयगय केल्यास त्याच्यावर कठोर कारवाई करू. कामगारांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी. शहरात कुठेही कचरा जाळला जाणार नाही, झाडू कर्मचारी गटारात कचरा टाकणार नाही याची दक्षता संबंधित वॉर्ड मुकादम व स्वच्छता निरीक्षकांनी घ्यावी. जेसीबी वाहन, कचरा वाहतूक करणारे वाहने, मक्तेदाराची वाहने, कामगारांना आवश्यक असणारी साहित्य आदींबाबत स्वच्छता विभागप्रमुख सहाय्यक आयुक्त अनिल पारखे यांना कार्यवाही करून पुर्तता करण्याचे आदेश देण्यात आले. २२ एप्रिलपासून सर्व प्रभाग अधिकाऱ्यांनी आपापल्या प्रभाग कार्यक्षेत्रात 'विशेष स्वच्छता मोहिमेचा' शुभारंभ करून सुक्ष्म पद्धतीने निरीक्षण ठेवून आपला प्रभाग स्वच्छ करून घ्यावा. सहाय्यक आयुक्त, उपायुक्तांनी अचानक भेट देऊन पाहणी करावी असे निर्देश त्यांनी दिले.

## बांधकाम व्यावसायिक डी.एस. कुलकर्णी यांच्या पुण्यातील कार्यालयावर ईडीचा छापा



■ **पुणे, अभिजित येरल्लू:**
बांधकाम व्यावसायिक दीपक सखाराम कुलकर्णी (डीएसके) यांच्या पुण्यातील कार्यालयावर ईडीने छापेमारी केली. मुंबईतून आलेले ईडीचे पथक शुक्रवारी (ता १९) पहाटेपासूनच डी.एस. कुलकर्णी यांच्या जंगली महाराज रस्त्यावर असलेल्या कार्यालयाची झाडझडती घेतली. उद्योजक डी. एस. कुलकर्णी यांच्यावर गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. पुण्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणात त्यांना अटक झाली होती. ५ वर्षांनंतर त्यांची जामिनावर सुटका झाली होती. मात्र, त्यांच्या अडचणी काही संपेनात. ईडीच्या कचाट्यात ते सापडले आहेत. गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी कुलकर्णी यांच्यावर पुण्यातील वेगवेगळ्या पोलिसांत अनेक गुन्हे दाखल आहेत. बांधकाम व्यावसायिक दीपक सखाराम कुलकर्णी (डीएसके) यांच्या जप्त केलेल्या मालमत्तेचा लिलाव करुन लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे आदेश उच्च न्यायालयाने विशेष न्यायालयाला दिले आहेत. लिलावामधील योग्य मालमत्तेची यादी उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाने तीन आठवड्यात तयार करावी, असंही उच्च न्यायालयाने सांगितलं आहे. डीएसके यांच्या १९५ स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आल्या होत्या. या मालमत्तेचा लवकरात लवकर लिलाव करुन ३५ हजार गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळावे यासाठी याचिका दाखल करण्यात आली. जप्त केलेल्या १९५ स्थावर मालमत्तांचा लिलाव करण्यास परवानगी द्यावी, असा अर्ज मावळ-मुळशीचे उपविभागीय दंडाधिकारी सुरेंद्र नवले यांनी येथील विशेष न्यायालयात केला. या सुनावणी घेताना मुंबई उच्च न्यायालयाने हा निकाल दिलाय.

दैनिक **लोकरक्षणाय** www.lokrakshanay.com

ठाणे, शनिवार, २० एप्रिल २०२४

**//सुविचार** 'जर आयुष्यात काही वाईट वेळ आली नसेल, तर मग आपल्या मध्ये लपलेले परके आणि गैरामधी दडलेले आपले लोक कधीही ओळखू शकणार नाहीत....' //



## स्पेशल पुदिना राईस

**साहित्य :** २ वाटी तांदूळ, २ वाटी पुदिन्याचे पाने निवडून व धुऊन, फोडणीसाठी तमालपत्र, जिरे, पाच ते सहा लसूण पाकळ्या, अंदाजे मीठ, लाल मिरची फोडणीसाठी.

**कृती :** पुदिना व लसूण पेस्ट बनवून घ्या. तांदळाचा मोकळा भात शिजवून



थंड होऊ द्या. पुलाव मसाला लहान १ चमचा, गरम पॅनमध्ये तेल, जिरे, तमालपत्र व मिरची घालून फोडणी द्या. त्यावर वाटलेला पुदिना घाला व परत पुलाव मसाला घाला. चांगले परतून शिजवलेला भात घाला. मीठ घाला, परतून वाफ येऊ द्या. खोबऱ्याचा किस व पुदिना पाने लावून सजवा व खायला वाढा. यामध्ये मिक्स पालक थोडी वाफवून व वाटून आपण घालू शकता.

## शाम्पूच्या वापरामुळे केसगळतीची समस्या वाढते का?



**कधीकधी अचानक केस खूप गळत असल्याचे तुमच्या लक्षात येते.केस गळण्याचे कारण शोधताना मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्वसाधारणपणे आपण रोज केस स्वच्छ धुण्यासाठी शाम्पूचा वापर करतो. त्यामुळे आपण वापरत असलेल्या शाम्पूमुळे तर केस गळत नाहीत ना? किंवा कोणता शाम्पू आपल्या केसांसाठी योग्य असू शकतो? हे प्रश्न आपल्याला पडू शकतात.**

केस गळणे ही अनेकांना भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. मात्र केस गळण्याची कारणे प्रत्येक व्यक्तीमध्ये निरनिराळी असू शकतात. डॉ. अपूर्वा शाह यांनी त्यांच्या 'हॅव अ ग्रेट हेअर डे' या पुस्तकामध्ये शाम्पू केल्यामुळे केस गळत नाहीत किंवा तेलांमुळे केसांच्या त्वचेतील मुळे बंद होत नाहीत, असे मत मांडले आहे. त्याचप्रमाणे हेअर एक्सपर्ट जावेद हबीब यांनी देखील त्यांच्या 'हेअर योगा' या पुस्तकामध्ये शाम्पूच्या वापरामुळे केस गळत नाहीत, या सत्याचा उलगडा केला आहे.

अयोग्य शाम्पू वापरल्यामुळे मात्र तुमच्या केसांची मुळे नक्कीच कमजोर होऊ शकतात. त्यामुळे बरेच दिवस तुमचे केस गळत राहतात व केसांचे खूप नुकसान होते. यासाठी तुमच्या केसांच्या प्रकारानुसार योग्य शाम्पूचा वापर करणे गरजेचे आहे.

### योग्य शाम्पू कसा निवडाल?

तुमच्या केसांचा प्रकार ओळखून योग्य शाम्पूची निवड करा. बाजारात अनेक ब्रॅण्डचे शाम्पू उपलब्ध असले तरी त्यातून तुमच्यासाठी योग्य प्रकारच्याच शाम्पूची निवड करा. त्याचप्रमाणे दर ४ ते ५ आठवड्यांनी तुमच्या शाम्पूचा ब्रॅण्ड बदला. सतत एकाच ब्रॅण्डचा शाम्पू वापरल्यामुळे तुमच्या केसांमधील त्वचेवर त्याचा दुष्परिणाम होतो व तुम्हाला हवा तसा योग्य बदल दिसून येत नाहीत.



**योग्य शाम्पूची निवड करण्यासाठी आधी तुमच्या केसांचा प्रकार ओळखा –**


- **ऑईली हेअर** – काही दिवस केसांमधील त्वचा तेलकट असते, पण केसांची शेवटची टोके कोरडी असतात.
- **ड्राय हेअर** – केस खरखरीत असतात, जे लवकर गुंततात व कुरळे किंवा फ्रिजी असतात.
- **नॉर्मल हेअर** – केसांचा पोत अति कोरडा अथवा अति तेलकटही नसतो.
- **डॅमेज हेअर** – या केसांमध्ये कोंडा किंवा केस दुभंगण्याची (स्प्लीट एण्ड) समस्या असते.
- **लीम्प हेअर** – केस सपाट असतात, ज्यांचा व्हॉल्युम जास्त नसतो किंवा केस फुललेले नसतात.

## अॅल्युमिनियम फॉईलमध्ये पदार्थ का शिजवू नयेत?

**जर** तुम्ही दररोज जेवणासाठी अॅल्युमिनियम फॉईलचा वापर करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे.

नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून असे समोर आले आहे की अॅल्युमिनियम फॉईलमध्ये शिजवलेले अथवा गुंडाळलेले पदार्थ खाल्ल्याने शरीरावर परिणाम होतो.

जेव्हा अॅल्युमिनियम फॉईलमध्ये अन्न शिजवले जाते, त्यावेळी मोठ्या प्रमाणात अॅल्युमिनियम अन्नात मिसळते आणि हे अन्न खाल्ल्याने ते शरीरात जाते. यामुळे हाडांचे आजार तसेच ब्रेन सेल्सची वाढ कमी होण्याची शक्यता असते.



## आवळा सरबत प्या, हे १० आजार टाळा

**आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आवळा उत्तम आहे. आवळा सरबत घेतल्याने आपल्याला अनेक फायदे होतात. आपले आरोग्य चांगले राहते. आयुष्य वाढण्यास मदत होते. आयुर्वेदातही आवळ्याला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. आवळा सरबतात मध मिसळले तर अधिक चांगले. तसेच आवळा ज्यूसमुळे महिलांच्या पाळीची समस्या दूर होण्यास मदत होते.**



- आवळा ज्यूस आणि मध एकत्र करून प्यायल्याने दम्याचा प्रभाव कमी होतो.
- रक्त शुद्ध करण्यासाठी आवळा सरबत आणि मध खूप गुणकारी आहे.
- आवळा सरबत नियमित घेतल्यास कोलेस्ट्रॉल कमी होते. त्यामुळे हृदयरोगाचा धोका टळण्यास मदत होते.
- आवळा खाण्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. कारण मेटाबॉलिजम व्यवस्थित होऊन वजन कमी होते.
- आवळा हा पाचक आहे. त्यामुळे पचन व्यवस्था व्यवस्थित राहते.
- आवळा सरबत प्यायल्याने चेहऱ्याला ग्लो येतो. तसेच त्वचारोग दूर होण्यास मदत होते.
- लघवीचा ज्यांना त्रास आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. सरबत प्यायल्याने लघवीसंबंधीचे आजार दूर होतात.
- ज्यांना किडनी स्टोनचा आजार आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. मूतखड्याचा आजार दूर होण्यास मदत होते.
- आवळ्यामुळे मधुमेह (Disbetes) नियंत्रणात राहण्यास मदत होते.
- सतत तोंड येत असेल तर आवळा सरबत प्यायल्याने ही समस्या दूर होते. तसेच डोळ्यांची शक्ती वाढण्यास मदत होते.

## फोनमध्येच भारी फोटो कसे काढाल? 'या' सोप्या टीप्स करा फॉलो

**आजकाल आपण कुठेही फिरायला गेलो तर तिथे सर्वात जास्त कोणतं काम करत असू तर ते फोटोग्राफी. म्हणजे प्रत्येक गोष्टीचे फोटो काढून ते सोशल मीडियावर आपण अपलोड करतच असतो. त्यात आता ते दिवस गेले जेव्हा लोक त्यांच्या आठवणी टिपण्यासाठी अर्थात फोटो काढण्यासठी मोठमोठे कॅमेरे वापरत होते. आता यासाठी बहुतेक जण मोबाईल फोनच वापरतात. तसेच, स्मार्टफोन कॅमेरे देखील दिवसेंदिवस सुधारत असताना, त्यापैकी बरेच जण जवळजवळ डीएसएलआरसारखे फोटो देतात.तर आज आम्ही तुम्हाला मोबाईल फोटोग्राफीच्या अशाच काही टीप्स आणि युक्त्या सांगणार आहोत, ज्याच्या मदतीने तुम्ही स्वस्त स्मार्टफोनमध्येही कॅमेऱ्यासारखे भारी फोटो काढू शकता.**

**स्मार्टफोनचा कॅमेरा कसा आहे ते आधी समजून घ्या**

स्मार्टफोन वापरून चांगले फोटो कॅप्चर करण्यासाठी सर्वात आधी तुम्हाला तुमच्या फोनचा कॅमेरा कसा आहे म्हणजेच त्याची क्षमता किती आहे ते जाणून घेणं गरजेचं आहे. कारण फोनचं कॅमेरा सेटअप जसं असेल त्यानुसारच फोटो येणार आहेत. पण आम्ही सांगणाऱ्या टीप्समुळे तुम्ही तुमच्या फोनच्या कॅमेऱ्याचा पुरेपुर वापर करून फोटो क्लिक करू शकता. आजकाल बहुतेक आधुनिक फोन अनेक लेन्स सेटअपसह येतात जे वापरकर्त्यांना अल्ट्रा-वाइड अँगल लेन्स, टेलीफोटो लेन्स, डेडिकेटेड पोर्ट्रेट लेन्स, मॅक्रो लेन्स हे सर्व ऑफर करतात. या सर्वांच्या मदतीने तर फोटोज आणखीच भारी येतात.

**फोटो काढताना फ्रेमवर खास लक्ष द्या**

तुम्ही कोणत्याही वस्तूचा किंवा व्यक्तीचा फोटो घेत असाल तर तो पूर्णपणे फ्रेममध्ये योग्यरीत्या असेल हे लक्षात ठेवा. म्हणजेच ऑब्जेक्ट फ्रेममध्ये चांगला आला पाहिजे आणि अंतरही अधिक नसावं. तसंच कॅमेऱ्याची उंची योग्यरीत्या सेट करून परफेक्ट फ्रेममध्ये फोटो काढावा.

**तुमची लेन्स स्वच्छ करा**

ही एक अत्यंत सोपी ट्रिक असली तरी नक्कीच प्रभावी अशी ट्रिक आहे. कारण स्मार्टफोनच्या कॅमेरा लेन्स दिसतात, त्याहूनही अधिक घाण असतात. त्यामुळे त्या पूर्णपणे स्वच्छ केल्याने तुम्हाला चांगले आणि डिटेल्ड फोटो मिळण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे फोटो काढण्यापूर्वी स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याची लेन्स नीट साफ करावी. कायमच लेन्सची काळजी घेणं फायद्याचं आहे.

**दोन्ही हात वापरा**

चांगला फोटो काढण्यासाठी नेहमी दोन हात वापरा, जेणेकरून तुमची फोनवरील पकड चांगली होईल आणि तुम्ही ऑब्जेक्ट आरामात कॅप्चर करू शकता. फोनवरील पकड चांगली असल्याने फोटो घेताना फोन हलणार नाही, ज्यामुळे फोटोही ब्लर किंवा चुकीच्या अँगल, फ्रेममध्ये येणार नाही. त्यामुळे दोन्ही हातांचा वापर करून फोटो काढणे, ही एक भारी ट्रिक आहे.

**अतिरिक्त प्रॉडक्ट्स वापरा**

डीएसएलआर कॅमेऱ्यांप्रमाणे, फोनसाठीही अतिरिक्त प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. जसं की, ट्रायपॉड, रिंग लाइट आणि अतिरिक्त लेन्स अशा विविध प्रॉडक्ट्सचा शक्य असल्यास वापर करावा. या सर्व उपकरणांच्या मदतीने फोटो अधिक भारी येतील. ट्रायपॉडने फोटो स्थिर येतील. रिंग लाईट प्रकाश अॅडजेस्ट करेल.



**झूमचा योग्य वापर**

फोटो घेण्यासाठी झूम या फीचरचा वापर योग्यरीत्या आणि जपून वापरा. कारण अधिक झूम केल्याने फोटोची क्लीऑरिटी खराब होते. त्यामुळे आवश्यक आणि शक्य असल्यास फोटो घेत असलेल्या ऑब्जेक्टच्या जवळ जा. अधिक झूममुळे फोटोचे रिझोल्युशन खराब होऊ लागते आणि स्वस्त फोनमध्ये डिजिटल झूम फारसे चांगले नसते. तसेच स्मार्टफोनमध्ये उपलब्ध असलेले वेगवेगळे मोड वापरा जेणेकरून फोटो अधिक चांगले येतील. मोबाईल फोनमध्ये पोर्ट्रेट, नाईट, प्रो आणि स्लो-मो असे अनेक पर्याय आहेत, ज्याच्या मदतीने तुम्ही चांगला फोटो काढू शकता.

**योग्य फोकसही महत्त्वाचा**

फ्रेमिंग ही देखील महत्वाची गोष्ट आहे. हे आम्ही वरच सांगितलं. फोटो काढताना ऑब्जेक्टला योग्य ठिकाणी ठेवणं महत्त्वाचं आहे. तसंच फोकसही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कारण फोटो काढताना फोकस योग्यरीत्या केल्यावर ऑब्जेक्टचा फोटो अधिक भारी आणि क्लीअर येईल. फ्रेममधून अनावश्यक वस्तू काढून टाकण्यासह फोकसिंग ही एक अत्यंत उपयोगी टीप आहे.


**एचडीआर मोडचा वापर**

हाय डायनॅमिक रेंज म्हणजेच एचडीआर या मोडच्या मदतीने तुम्ही भारी भारी दर्जाचे फोटो क्लिक करू शकता. म्हणजेच तुम्ही एखादा मोठा फोटो क्लिक करत असाल तर अशा वेळी तुम्ही एचडीआर वापरू शकता. यासह, तुम्हाला तुमच्या फोटोमध्ये बरेच तपशील पाहायला मिळतील. एचडीआर एकाधिक एक्सपोजर कॅप्चर करते आणि फोटोच्या प्रकाश आणि गडद भागांमध्ये चांगले संतुलन राखते. एचडीआरमध्ये पार्क, इमारत, मंदिर किंवा मोठ्या वस्तूचा फोटो क्लिक करणे एक चांगला पर्याय आहे.

## "साडी नेसून कॉमेडी करायची काय गरज?" भाऊ कदम आणि ओंकार भोजनेला साडीत पाहून नेटकऱ्यांनी दिल्या प्रतिक्रिया

'कलर्स मराठी' वाहिनीवर लवकरच सुरू होणाऱ्या एका नव्या कार्यक्रमाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. हा कार्यक्रम म्हणजे 'हसताय ना? हसायलाच पाहिजे!' 'चला हवा येऊ द्या'मधून घराघरात पोहोचलेले महाराष्ट्राचे लाडके डॉ. निलेश साबळे यांच्याबरोबर विनोदाची ही सुपरफास्ट मेल आता २७ एप्रिलपासून सुरू होत आहे. त्यामुळे सध्या या नव्या कार्यक्रमाचे नवनवीन प्रोमो प्रदर्शित होत आहेत. नुकताच 'हसताय ना? हसायलाच पाहिजे!' कार्यक्रमाचा एक प्रोमो प्रदर्शित झाला आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्याच भागामध्ये 'बाईपण भारी देवा' चित्रपटातील कलाकार मंडळी उपस्थित असणार आहेत. अभिनेत्री सुकन्या मोने, शिल्पा नवलकर, दीपा परब, सुचित्रा बांदेकर, वंदना गुप्ते प्रोमोमध्ये पाहायला मिळत आहे. शिवाय या प्रोमोमध्ये भाऊ कदम आणि ओंकार भोजने महिलेच्या वेशात दिसत आहेत. त्यांनी 'बाईपण भारी देवा' चित्रपटातील अभिनेत्रींचा लूक केला आहे. हेच पाहून नेटकरी 'चला हवा येऊ द्या'सारखाच हा कार्यक्रम असल्याचं म्हणत आहेत. 'हसताय ना? हसायलाच पाहिजे!'च्या या प्रोमोवर एका नेटकरीने लिहिलं आहे, ''साडी नेसून कॉमेडी करायची काय गरज?'' तसेच दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, ''बायकांचे रोल करायला बायका मिळत नाहीत का?'' तर तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, ''फॉरमॅट तोच आहे फक्त नाव नवीन आहे.'' दरम्यान, 'हसताय ना? हसायलाच पाहिजे!' कार्यक्रम २७ एप्रिलपासून शनिवार-रविवार रात्री ९ वाजता पाहायला मिळणार आहे. या कार्यक्रमात भाऊ कदम व ओंकार भोजने व्यतिरिक्त सुपर्णा श्याम, स्नेहल शिदम आणि रोहित चव्हाण असे अनेक कलाकार झळकणार आहेत. विशेष म्हणजे या कार्यक्रमात महाराष्ट्राचे विनोदाचे बादशहा, अत्यंत संवेदनशील गुणी अभिनेते भरत जाधव आणि चार दशकं सिनेसृष्टीवर अधिराज्य गाजवणाऱ्या अलका कुबल आठल्ये हे दोन महान कलाकार दर भागामध्ये सेलिब्रिटी पाहुणे म्हणून या कार्यक्रमाला दाद देण्यासाठी लाभणार आहेत.






## आमदार भावाच्या सासऱ्यांसाठी रितेश देशमुखची खास पोस्ट, वाढदिवसाच्या दिल्या शुभेच्छा!




प्रसिद्ध चित्रपट निर्माते वाशू भगनानी यांचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त रितेश देशमुखने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर केली आहे. रितेश व वाशू भगनानी हे एकाच क्षेत्रातील असले तरी या दोघांचं कौटुंबीक नातं आहे. रितेशने शेअर केलेल्या स्टोरीने लक्ष वेधलं आहे.

वाशू भगनानी हे रितेश देशमुखच्या भावाचे सासरे आहेत. लातुर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख हे वाशू भगनानी यांचे जावई आहेत. रितेश देशमुखची वहिनी दिपशिखा देशमुख पूजा व वाशू यांची मोठी मुलगी आहे. दिपशिखा जॅकी भगनानीची मोठी बहीण आहे. वाशू भगनानी यांच्या वाढदिवसानिमित्त रितेशने त्यांच्याबरोबरचा एक फोटो पोस्ट करत शुभेच्छा दिल्या आहेत.

**रितेश देशमुखची इन्स्टाग्राम स्टोरी**

रितेश देशमुखची भगनानी व रकुल प्रीतशी मैत्री आहे. फेब्रुवारीत या जोडप्याने गोव्यात लग्नगाठ बांधली. त्यांच्या लग्नाला धिरज देशमुख व दिपशिखा देशमुख यांच्याबरोबरच रितेश व त्याच्या आईनेही हजेरी लावली होती. दोघांच्या लग्नाची जोरदार चर्चा झाली होती.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 7 | | | | | 3 | | 8 |
| 8 | 2 | | | 1 | 4 | 9 | 5 | |
| 4 | | 9 | | | | | | |
| | | | | 5 | | 7 | | |
| | 3 | | 2 | | | 4 | | |
| 1 | 9 | 5 | | | 8 | | 2 | |
| | | | 5 | | | | | 9 |
| 5 | 8 | | 6 | | | 2 | | |
| | 4 | | | | | | | |

### उत्तर सुडोकू -६०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 8 | 4 | 3 | 6 | 9 | 7 | 2 | 1 |
| 6 | 7 | 9 | 2 | 8 | 1 | 3 | 4 | 5 |
| 1 | 3 | 2 | 4 | 5 | 7 | 8 | 9 | 6 |
| 7 | 9 | 6 | 5 | 2 | 4 | 1 | 3 | 8 |
| 2 | 1 | 3 | 6 | 7 | 8 | 4 | 5 | 9 |
| 8 | 4 | 5 | 9 | 1 | 3 | 6 | 7 | 2 |
| 9 | 5 | 1 | 7 | 3 | 6 | 2 | 8 | 4 |
| 3 | 2 | 8 | 1 | 4 | 5 | 9 | 6 | 7 |
| 4 | 6 | 7 | 8 | 9 | 2 | 5 | 1 | 3 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

### २० एप्रिल

- १७७०: प्रसिद्ध दर्यावर्दी सागर संशोधक कॅप्टन जेम्स कूक यांनी ऑस्ट्रेलिया खंडाचा शोध लावला.
- १९३९: अॅडॉल्फ हिटलरचा ५० वा वाढदिवस जर्मनीमध्ये सार्वजनिक सुटी देऊन साजरा करण्यात आला.
- १९४५: दुसरे महायुद्ध - अमेरिकन फौजांनी लाइपझिग शहराचा ताबा घेतला.
- १९४६: राष्ट्रसंघ ही संस्था बरखास्त करून पुढे याचेच संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेमध्ये (United Nations) रूपांतर झाले.
- २००८: डॅनिका पॅट्रिक ह्या इंडी कार रेस जिंकण्याच्या पहिल्या महिला चालक झाल्या.
- ७८८: ७८८ई.पुर्व: आदि शंकराचार्य यांचा जन्म.
- १७४९: मराठा सत्तेचा ध्वज अटकेपार नेणाया पेशव्यांचे श्रद्धास्थान असलेल्या देवदेवेश्वर मंदिराची नानासाहेब पेशवे यांनी पर्वतीवर स्थापना केली.
- १८०८: फ्रान्सचे पहिले अध्यक्ष नेपोलियन (तिसरे) यांचा जन्म. (मृत्यू: ९ जानेवारी १८७३)
- १८८९: नाझी हुकूमशहा तसेच दुसऱ्या महायुद्धाचा प्रारंभ करणारे अॅडॉल्फ हिटलर यांचा जन्म. (मृत्यू: ३० एप्रिल १९४५)
- १८९६: सार्थ ज्ञानेश्वरी चे लेखक प्रा. ह. भ. प. शंकर वामन उर्फ सोनोपंत (मामासाहेब) दांडेकर यांचा माहीम, ठाणे येथे जन्म. (मृत्यू: ९ जुलै १९६८)
- १९१४: ज्ञानपीठ विजेते ओरिया साहित्यिक गोपीनाथ मोहंती यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑगस्ट १९९१)
- १९३९: ध्रुपद गायक सईदुद्दीन डागर यांचा जन्म.
- १९५०: आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचा जन्म.
- १९६६: याहूचे सहसंस्थापक डेव्हिड फिलो यांचा जन्म.
- १९८०: भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक अरीन पॉल यांचा जन्म.
- १९१८: नोबेल पारितोषिक विजेते जर्मन भौतिकशास्त्रज्ञ कार्ल ब्राऊन यांचे निधन. (जन्म: ६ जून १८५०)
- १९३८: न्यायाधीश व कायदेपंडित चिंतामणराव वैद्य यांचे निधन. (जन्म: १८ ऑक्टोबर १८६१)
- १९६०: बासरीवादक संगीतकार पन्नालाल घोष यांचे निधन. (जन्म: २४ जुलै १९११)
- १९७०: गीतकार आणि शायर शकील बदायूँनी याचे निधन. (जन्म: ३ ऑगस्ट १९१६ झ बदायूँ, उत्तर प्रदेश)
- १९९९: रुचिरा पुस्तकाच्या लेखिका कमलाबाई कृष्णाजी ओगले याचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९१३)

## भविष्य

**मेष** – कौटुंबिक सौख्यात रमाल. गरज नसतांना प्रवास करावा लागू शकतो. लहान मुलांच्यात रमून जाल. व्यावसायिक बदल लक्षात घ्यावेत.

**वृषभ** – ऐक्याची भावना जोपासाल. दिवस मनाप्रमाणे व्यतीत कराल. थोरांशी सल्ला-मसलत कराल. कामात चंचलता येईल.

**मिथुन** – मोकळेपणाने बोलणे टाळाल. पत्नीचा प्रेमळ सहवास मिळेल. झोपेची तक्रार दूर होईल. संसर्गजन्य आजारांपासून काळजी घ्यावी.

**कर्क** – उगाचच चंचलता वाढेल. फार विचार करत बसू नका. मनातील इच्छेला अधिक महत्व द्याल. जोडीदाराचा हट्ट पुरा कराल. जुने विचार मनातून काढून टाकावेत.

**सिंह** – कलेसाठी अधिक वेळ काढाल. सर्वांच्या कौतुकास पात्र व्हाल. कामात स्थिरता ठेवावी. गप्पांमध्ये वेळ घालवाल. पोटाची काळजी घ्यावी. हातातील कामात यश येईल.

**कन्या** – कामात जोडीदाराचा हातभार लागेल. प्रगतीची नवीन संधी उपलब्ध होईल. मुलांना नवीन गोष्टी शिकवाल. व्यायामाचे महत्व लक्षात घ्यावे. अपचनाचा त्रास जाणवेल.

**तुला** – काही कामे कमी श्रमात पार पडतील. घरातील वातावरण अस्वस्थ वाटू शकते. नवीन गोष्टी आमलात आणताना विचार करावा. अचानक धनलाभ संभवतो. धार्मिक ग्रंथांचे वाचन करावे.

**वृश्चिक** – गरज नसेल तर प्रवास टाळावा. जोडीदाराचे सौख्य वाढेल. नवीन गोष्टींकडे कल वाढेल. मोहाळ बळी पडू नका. जवळचे मित्र भेटतील. भावंडांचे प्रश्न सामोरी येतील.

**धनु** – कौटुंबिक स्वास्थ्याला प्राधान्य द्यावे. नवीन लोकांशी संपर्क वाढेल. कामाचा आनंद घ्याल. लोकोपवादाला बळी पडू नका. जुन्या कामात प्रगती कराल. धैयनि कामे हाती घ्याल.

**मकर** – मानसिक ताण जाणवू शकतो. सतत बडबड कराल. कमिशनचा विचार आधी कराल. आवडते पुस्तक वाचाल. रागावर नियंत्रण ठेवावे. कामात आळस आड येऊ शकतो.

**कुंभ** – तुमच्या स्मरणशक्तीचे कौतुक केले जाईल. घरातील साफसफाई कराल. काही सकारात्मक बदल कराल. आवडता छंद जोपासाल. सामुदायिक गोष्टीत लक्ष घालू नका. नवीन विचारांची कास धरावी लागेल.

**मीन** – उगाचच थकवा जाणवेल. सकारात्मक विचार करावेत. हस्तकलेत मन रमवावे. लबाड लोकांचा संग टाळावा. खोट्याचा आधार घेऊ नका. नवीन विचारांची कास धरावी लागेल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# उत्सवारंभ

निवडणूक गावकी-भावकीची नाही, तर देशाचे भवितव्य घडवणारी आहे, हे खरे असले तरी ती सर्वसामान्य माणसांच्या प्रश्नांभोवती फिरत राहिली, तर लोकांना त्याबाबत अधिक जिव्हाळा वाटेल. लोकसभेच्या एकूण ५४३ जागांपैकी पहिल्या टप्प्यातील १०२ जागांसाठी आज होणारे मतदान म्हणजे जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशातील पंचवार्षिक उत्सवाची खऱ्या अर्थाने सुरुवात. दोन महिन्यांपासून निवडणुकीची धामधूम सुरू आहे. देशभरात सात टप्प्यांमध्ये मतदान होणार असल्यामुळे अखेरच्या टप्प्यातील जागांवरील उमेदवारांची निश्चितीही अनेक ठिकाणी झालेली नाही. पक्ष आणि आघाड्यांमध्ये उमेदवारीवरून धुसफूस, कुरघोड्या सुरू आहेत. आपल्याकडे जत्रा-यात्रांपासून क्रिकेटच्या सामन्यांपर्यंत अनेक उत्सवांना या म्हणून लोकांना सांगावे लागत नाही. माहिती मिळाली की हजारोंच्या संख्येने गर्दी करतात; परंतु निवडणुकीच्यावेळी मात्र लोकांना पुन्हा पुन्हा मतदान करा म्हणून सांगावे लागते. सरकारी यंत्रणांपासून सामाजिक संस्थांपर्यंत विविध पातळ्यांवर मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातात. यंदा तर महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांत उन्हाचा पारा वाढल्याने मतदारांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे. अर्थात सर्व क्षेत्रांतील राजकारणग्रस्तता वाढली आहे. निवडणुकीच्या राजकारणाबाबत लोकांची रुचीही वाढली आहे. त्यामुळे पारांवरील गप्पांपासून ते बस, ट्रेनमधील गर्दीपर्यंत सगळीकडे ज्याची चर्चा होते, त्या निवडणुकीसाठी मतदान करायला लोक मोठ्या संख्येने बाहेर पडतील, अशी आशा बाळगायला हरकत नाही. किंबहुना लोकांनी मोठ्या संख्येने मतदान करावयास हवे. अनमोल अधिकार बजावायला हवा. निवडून आलेल्या सरकारबद्दल नंतर नुसत्याच तक्रारी करीत बसण्यापेक्षा आपल्या पसंतीचे सरकार निवडण्यासाठी आवर्जून मतदान करणे महत्त्वाचे. लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक मत महत्त्वाचे असते. मतदानाबाबतची जागरुकता वाढत चालली असताना आजही खेड्यापाड्यांतील, दुर्गम वाड्यावस्त्यांवरील लोक ज्या कर्तव्यभावनेने मतदान करतात, ती कर्तव्यभावना मोठ्या शहरांतून विशेषतः उच्चभ्रू घटकांमध्ये दिसत नाही. वेळोवेळी झालेल्या मतदानाचे आकडे पाहिले तरी मोठ्या शहरांमधील उच्चभ्रू वस्त्यांमधील मतदानाची टक्केवारी सर्वात कमी असलेली दिसते. मतदान न करणारे हे लोकच हिरिरीने लोकशाहीवर गप्पा मात्र मोठमोठ्या मारत असतात. मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी कुठे लक्ष केंद्रित करावयास पाहिजे, हेही यानिमित्ताने संबंधित यंत्रणांनी लक्षात घ्यावयास हवे. पहिल्या टप्प्यात मतदान होणाऱ्या देशातील १०२ मतदारसंघांमध्ये महाराष्ट्रातील पाच मतदारसंघांचा समावेश आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार हे पहिल्या टप्प्यातील प्रमुख उमेदवार असून उपराजधानी नागपूरमध्ये गडकरी यांच्यापुढे काँग्रेसच्या विकास ठाकरे यांचे तर मुनगंटीवार यांच्यापुढे काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर यांचे आव्हान आहे. पूर्व विदर्भातील भंडारा-गोंदिया, गडचिरोली, रामटेक या मतदारसंघांमध्येही मतदान होत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार प्रफुल्ल पटेल, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार या प्रमुख नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. नक्षलग्रस्त भाग म्हणून ओळखल्या जाणा-या गडचिरोलीमध्ये या टप्प्यात मतदान होत आहे. पहिल्या टप्प्यातील १०२ मतदारसंघ २१ राज्यांमधील आहेत. आठ केंद्रीय मंत्री, दोन माजी मुख्यमंत्र्यांसह अनेक महत्त्वाच्या नेत्यांचे भवितव्य आज मतदान यंत्रांमध्ये बंद होणार आहे. भाजपचे सर्वानंद सोनोवाल, किरण रिजिजू, विप्लव देव, काँग्रेसचे गौरव गोगोई, नकुलनाथ, कार्ती चिदंबरम्, द्रमुकच्या कनिमोळी, लोकजनशक्ती पक्षाचे चिराग पासवान आदींचा त्यात समावेश आहे. पहिल्या टप्प्याचे मतदान होत असतानाही निवडणुकीतील प्रचाराला एक दिशा मिळायला हवी होती, ती मिळताना दिसत नाही. २०२४ची निवडणूक आहे असे म्हणावे तर सगळे २०१९च्या पानावरून पुढे सुरू असल्यासारखे दिसते. भाजपकडून राम मंदिर उभारणी आणि जम्मू-काश्मिरमधील ३७० वे कलम रद्द केल्याच्या वचनपूर्तीचा दाखला देऊन विकसित भारताचे स्वप्न दाखवण्यात येत आहे. राज्यघटनेला धोका निर्माण झाल्याची व सर्वसामान्य माणसांचे दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडवण्यात मोदी सरकारला अपयश आल्याची टीका करीत त्याभोवती काँग्रेस व इंडिया आघाडीने प्रचार केंद्रित केला आहे. राष्ट्रीय पातळीवरील मुद्यांचाच पहिल्या टप्प्यातील प्रचारात अधिक गवगवा दिसून येत असून स्थानिक पातळीवरील मुद्दे प्रचारातून गायब झाले आहेत. विदर्भात लोकांच्या जगण्यामरण्याशी संबंधित अनेक प्रश्न असताना त्याबाबत विरोधक काही बोलत नाहीत आणि सत्ताधाऱ्यांच्या विषयपत्रिकेवर ते प्रश्न नाहीत. सर्वसामान्य माणसांचे प्रश्न हरवलेल्या परिस्थितीत एक पंचमांश मतदारसंघातील मतदार आज मतदानाचा हक्क बजावत आहेत. निवडणूक गावकी-भावकीची नाही, देशाचे भवितव्य घडवणारी आहे, हे खरे असले तरी ती सर्वसामान्य माणसांच्या प्रश्नांभोवती ती फिरत राहिली तर लोकांना त्याबाबत अधिक जिव्हाळा वाटेल.

# दुसरी श्वेत क्रांती कधी होणार?



आज भारत हा जगात सर्वात जास्त दूध उत्पादन करणारा देश आहे. याचे श्रेय प्रामुख्याने दिवंगत वर्गिस कुरियन यांना द्यायला हवे. त्यांनी गावोगावच्या शेतकऱ्यांकडील दूध संकलित करून, त्याचे पाश्चरायझेशन करून असे दूध ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याची साखळी निर्माण केली. त्यांचे हे काम खूप मोठे आहे. त्यांनी निर्माण केलेली 'अमूल' ही सहकारी संस्था आज दूध आणि दूग्धजन्य पदार्थ यांचे वितरण करणारी देशातील पहिल्या क्रमांकाची संस्था आहे. 'अमूल'ची वार्षिक उलाढाल ७५ हजार कोटींच्या घरात आहे. त्यात सतत वाढ होत आहे. मात्र, महाराष्ट्र यात खूपच मागे पडला आहे, कारण दूध उत्पादन आणि उत्पादनखर्च यांचा मेळ बसत नाही; त्यामुळे दूध महाग अशी सार्वत्रिक स्थिती आहे.

भारतात आता 'अमूल'प्रमाणे दूध संकलन व वितरण करणाऱ्या अनेक सहकारी व खाजगी कंपन्या आहेत. लाखो दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून दूध संकलन करणे, त्याचे पाश्चरायझेशन करणे आणि वितरण करणे या कामामुळे लाखो लोकांना आज रोजगार उपलब्ध झाला आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांनी दोन-चार दुभती गुरे पाळून केलेल्या दूध संकलन व वितरण करण्याची व्यवस्था ही भारताची खासियत आहे. या व्यवसायामुळे लाखो सीमान्त व अल्पभूधारक शेतकरी आर्थिकदृष्ट्या संपन्न जीवन जगत आहेत. दुभत्या गुरांचे संगोपन करणे, त्यांचे दूध काढणे आणि ते संकलन केंद्रावर पोहोचविणे ही कामे प्रामुख्याने घरातील महिला करतात. अशा रीतीने खेडेगावातील लाखो स्त्रियांना चांगले उत्पन्न देणारा व्यवसाय उपलब्ध झाला आहे.

आज भारतात ३० कोटी दुधाळ गाई व म्हशी आहेत. परंतु त्यांना पुरेसा पौष्टिक आहार मिळत नसल्यामुळे अशी गुरे त्यांच्या अंगभूत क्षमतेच्या ५० टक्के एवढे कमी दूध देतात. आज देशात ओला चारा, सुकी वैरण आणि प्रथिनयुक्त पशुखाद्य यांची २५ टक्के टंचाई आहे; परिणामी पशुखाद्य महाग झाले आहे. त्यामुळे गरीब दूध उत्पादक शेतकऱ्याला पुरेसे पशुखाद्य विकत घेणे परवडत नाही आणि दूध देणारी गुरे अर्धपोटी राहतात. परिणामी दूध उत्पादन कमी, उत्पादनखर्चात वाढ आणि दूध महाग अशी सार्वत्रिक स्थिती आहे. दूध महाग असल्यामुळे गरीब लोकांना ते चहात घालण्यापुरतेही विकत घ्यायला परवडत नाही. त्यामुळे, दुभत्या गुरांना पुरेसे खाद्य मिळण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत.

आज पर्यावरण बदलाच्या काळात मोसमी पावसाचे वर्तन बेभरवशाचे झाल्यामुळे शेतकऱ्यांना पिकापासून हमखास उत्पन्न मिळण्याची शाश्वती नाही. त्यामुळे अधिकाधिक शेतकरी पशुपालन व्यवसायाकडे वळत आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस गुरांच्या खाद्याची समस्या उग्र होत आहे. या समस्येची सोडवणूक तात्काळ व्हायला हवी; अन्यथा दूध व्यवसाय धोक्यात येईल. दूध उत्पादक शेतकऱ्यांपासून वितरण करणाऱ्यांपर्यंत सर्वांचा रोजगार संपेल आणि ग्राहकांना दूध मिळणे बंद होईल. हा संभाव्य अनर्थ टाळण्यासाठी राज्यकर्त्यांपासून दूध शेतकऱ्यांपर्यंत सर्वांनी कामाला लागले पाहिजे.

हरित क्रांती होण्यापूर्वी देशात मोठ्या प्रमाणात ज्वारी व बाजरी ही पिके घेतली जात. अशा पिकांचा कडबा हा चांगला खुराक होता. परंतु हरित क्रांतीच्या नंतर पीक पद्धतीत मोठा बदल घडून आला. शेतकरी ज्वारी वा बाजरी या पिकांऐवजी खरीप हंगामात भात आणि रब्बी हंगामात गहू ही पिके घेऊ लागले. सदर पिकांचे अवशेष म्हणजे अनुक्रमे भाताचा पेंढा आणि गव्हाचे काड यांचा पशुखाद्य म्हणून उपयोग होत नसल्याने शेतकरी ते जाळून टाकतात. अशा रीतीने हरित क्रांतीने पशुखाद्याची टंचाई निर्माण केली. परंतु याचवेळी शेतीच्या कामासाठी बैलांचा वापर करण्याऐवजी शेतकरी ट्रॅक्टर वापरू लागल्यामुळे पशूंची संख्या आणि परिणामी पशुखाद्याची मागणी कमी होऊ लागली. परंतु त्यानंतरच्या काळात धवल क्रांतीला आरंभ झाल्यावर ग्रामीण भागात दुभत्या गायींची संख्या वेगाने वाढू लागली. परिणामी पशुखाद्याची मागणी वेगाने वाढू लागली. परंतु ग्रामीण व्यवस्थेत होत असलेल्या स्थित्यंतराकडे राज्यकर्ते, शेतकऱ्यांचे नेते आणि शेतकरी यांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे आज पशुखाद्याची समस्या गंभीर झाली आहे. ठरविले तर पशुखाद्याची टंचाई संपविता येईल. त्यासाठी शेतकऱ्यांनी पडीक जमिनीवर दर्जेदार चाऱ्याचे पीक घ्यावे. अशा चाऱ्याची वाणे कृषी तज्ज्ञांनी विकसित केली आहेत; परंतु हे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेले नाही. त्यामुळे दर्जेदार चाऱ्याची बियाणी देशातील सात लाख खेड्यांमध्ये पोहोचविण्याची चोख व्यवस्था व्हावी. हे काम अंबानी, अदानी, टाटा असे मोठे उद्योगपती अर्थातच करणार नाहीत. ते काम देशातील सरकारांनाच करावे लागेल.

दुभत्या गुरांना पुरेशा प्रमाणात प्रथिने मिळत नाहीत; हीदेखील मोठी समस्या आहे. हा प्रश्न निकालात काढण्यासाठी शेतकऱ्यांनी शेताच्या बांधावर शेवगा वा तुती अशा वनस्पतींची लागवड करावी. सदर वनस्पतींच्या पाल्यात त्या पाल्याच्या वजनाच्या २५ टक्के प्रथिने असतात. दुभत्या गुरांना रोज अशा वनस्पतींचा पाच किलो पाला खायला दिला की त्यांना पुरेशी प्रथिने मिळतील. क्यूबात दुभत्या गुरांना असा पाल्याचा खुराक दिला जातो. त्यामुळे त्या देशात दूध उत्पादनखर्च लक्षणीय प्रमाणात कमी आहे. भारताने हा कित्ता गिरवायला हवा. तसे केले, तर देशात स्वस्त दराने दूध उपलब्ध होईल. त्यानंतर ते बालकांसाठी व वृद्धांसाठी स्वस्तात उपलब्ध होईल.

चारा व पशुखाद्य हे प्रश्न निकालात काढल्यावरही एक मोठा प्रश्न शिल्लक राहतो. तो म्हणजे गावागावात चांगली पशुवैद्यकीय सेवा नसणे हा. ह्यअमूलह्ण या संस्थेने त्यांच्या सभासदांसाठी पशुवैद्यकीय सेवेचे चांगले जाळे निर्माण केले. आज महाराष्ट्रात जवळपास प्रत्येक गावात सरकारने पशुवैद्याची नेमणूक केली आहे. परंतु असे कर्मचारी आपले काम करीत नाहीत. सरकारी कर्मचाऱ्यांनी काम न करणे हा किमान आपल्या देशातील स्थायीभाव आहे. सरकारने नेमलेल्या पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या पगाराच्या व्यतिरिक्त चांगले काम केल्यास त्यांना प्रोत्साहन म्हणून रोख मोबदला सरकारने द्यावा. कदाचित, अशा योजनेमुळे काही कर्मचारी चांगले काम करू लागतील. परंतु पशुवैद्यकीय कर्मचारीच नव्हे, तर सर्व सरकारी कर्मचारी चिरीमिरी घेतल्याशिवाय काम करीत नाहीत, असा अनुभव आहे. ही संस्कृती कशी बदलायची? भारतात सरकारी खात्यांमध्ये, अगदी न्यायव्यवस्थेतही भ्रष्टाचार फोफावला आहे. त्यात सुधारणा कोण व कधी करणार?

दूध व्यवसायाच्या भरभराटीसाठी वर सुचविलेल्या सुधारणा करण्यासाठी सरकारला अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही. सरकारने धोरणात थोडासा बदल केला की गाडी रुळावर येऊन वेगाने दौडू लागेल. परंतु असा बदल होण्यासाठी राज्यकर्त्यांना दूध व्यवसायाच्या संदर्भात निर्माण झालेल्या समस्या कळायला हव्यात.

# निष्पक्षतेला भय?

'पटल्यास प्रशंसा, न रुचल्यास रोष' हा निकष लावून न्यायालयीन निकालांची प्रतवारी करणे अयोग्य असून त्यामुळे कायदेशीर नियमांचे अवमूल्यन होत असल्याची कळकळ नुकतीच व्यक्त झाली. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांमधील २१ निवृत्त न्यायमूर्ती ही काळजी मांडतात, तेव्हा तो प्रतिष्ठेचा मुद्दा ठरतो. ही व्यथा त्यांनी थेट सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना पत्र लिहून कळवल्याने या मुद्द्यावर आता देशव्यापी चर्चा होईल. मुळात, न्यायव्यवस्थेच्या पावित्र्याचा सातत्याने अनादर होतो आहे का, भारतीय न्यायसंस्थेचा अवमान करून न्यायालयांचे महत्त्व कमी केले जाते आहे का, या प्रकारांमुळे नागरिकांचा न्याययंत्रणेवरील विश्वास डळमळीत झाला आहे काय, असे करणारे लोक नक्की आहेत तरी कोण, न्यायालयांवर अनावश्यक दबाव येतो तो नक्की कोणाचा आदी प्रश्नही या निमित्ताने पुढे येतील. न्याय आणि निष्पक्षतेला भयाच्या कवडशांनी घेरण्याचे काम नेमके कोण करीत आहेत, यावरील खल क्रमप्राप्त आहे. अनावश्यक दडपणापासून न्यायव्यवस्थेला वाचवा, अशी गळ सर्व न्यायाधीशांनी घातली आहे. सहा वर्षांपूर्वी काही निवृत्त न्यायाधीशांनी तत्कालीन सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांना पत्र लिहून न्यायपालिकेवरील जनविश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची विनंती केली होती. सर्वसामान्यांचा न्यायालयांवरील विश्वास हे भारताचे मौलिक संचित आहे. पक्षीय अभिनिवेश सोडून अशा गोष्टींकडे बघायला हवे. दरम्यान, हा न्यायव्यवस्थेला धमकावण्याचा प्रकार असल्याचा आरोप काँग्रेसने केला असल्याने निवृत्त न्यायमूर्तींचा रोख कुणाकडे आहे, हे समजण्यासारखे आहे. न्यायालयाने निवडणूक रोख्यांना भ्रष्टाचार ठरविले असून मणिपुरातील स्थितीवरून केंद्र सरकारवर ठपकाही ठेवला आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी मागे व्यक्त केलेले मत या पार्श्वभूमीवर सयुक्तिक ठरते. आपल्या संवैधानिक लोकशाहीचे तत्त्व घटनात्मक मूल्ये आणि या मूल्यांवर आधारित शासकीय संस्थांमुळे आजवर टिकले आहे.

# Firing outside Salman Khan's home
## Did Lawrence Bishnoi threaten the actor again? Police makes another arrest



**MUMBAI**

Following the firing at Bollywood actor Salman Khan's residence on April 13 morning, Bandra Police made another arrest linked to the incident on April 19. The arrest comes after thorough investigation with Ola Cabs, leading to a breakthrough in the case.

According to information, an Ola cab was booked in the name of Lawrence Bishnoi and sent to Galaxy Apartment on Friday (April 19) morning. Upon inquiry, it was revealed that the person who booked the cab was 20-year-old Rohit Tyagi from Ghaziabad.

When Salman Khan's security staff informed the police, they took information from Ola about the cab driver. After this, Bandra Police arrested the accused who booked an Ola car from Ghaziabad.

The incident on April 13 involved gunfire outside Salman Khan's residence in Bandra. Two suspects, Vicky Gupta (24) and Sagar Pal (21), were previously arrested in connection with the shooting.

Further investigations revealed a link to Arpita Farms, a farmhouse often visited by Salman Khan. The suspects, originally from Bihar, had rented a house near the property in Panvel's Harigram area.

The accused had confessed to receiving a pistol at their rented house 25 days prior to the shooting. Subsequently, 19-year-old Sonu Gupta, brother of Vicky Gupta, was detained in Chandigarh for questioning.

The investigation uncovered a Facebook account under the name of gangster Lawrence Bishnoi's brother, Anmol Bishnoi, claiming responsibility for the attack. The post, made three hours before the shooting, originated from an IP address traced to Portugal.

Regarding the incident, Maharashtra chief minister Eknath Shinde had met Salman Khan, assuring decisive action against the Bishnoi gang. "There is no gang (war) in Mumbai. The Underworld has no (place) in Mumbai. This is Maharashtra, this is Mumbai. We will finish this (Lawrence) Bishnoi (gang) so that no one dares to do such a thing," Shinde asserted.

# Delhi court reserves order on diabetic Arvind Kejriwal's plea for insulin in Tihar jail

**NEW DELHI**

The Delhi's Rouse Avenue Court on Friday reserved the order on a plea moved by Delhi chief minster Arvind Kejriwal seeking direction to Tihar jail authorities to administer insulin and allow him to consult his doctor through video conferencing daily for 15 minutes over his acute diabetes and fluctuating blood sugar level.

The court will pronounce its orders on Monday, April 21. Arvind Kejriwal is under judicial custody in the money laundering case related to the Delhi liquor excise policy case.

The plea stated that the Delhi chief minister's wife Sunita Kejriwal should be allowed to join the consultation with Dr Ravichandra Rao, through video conference.

The plea further stated that from February 1 under careful medical supervision, Arvind Kejriwal was able to start the 'Insulin Reversal Programme' and the administration of insulin was discontinued. The strict medical supervision of a diabetes expert helped in effectively regulating glucose levels. The medicines, food and exercises would be titrated (continuously measured and adjusted) daily using a continuous glucose monitoring sensor in which blood sugars were monitored closely.



Due the such daily medical and dietary interventions and a tailor-made daily exercise intervention- the applicant was successfully removed from exogenous insulin and switched to oral medication while maintaining optimal glucose levels during the program, stated the plea.

Due to his arrest on March 21, the applicant was incapacitated and was unable to follow the said Insulin Reversal Programme, stated the plea.

The plea was moved even as Delhi Lt Governor VK Saxena on Thursday asked the director general of prisons to submit a factual report into the AAP's allegations that Arvind Kejriwal was not being provided insulin in Tihar jail. The L-G's order followed Delhi cabinet minister Atishi's allegation that there was a plot to kill the chief minister, who has been arrested by the Enforcement Directorate in the excise policy case, by denying him home-cooked food and insulin in jail, a charge rejected by the prison authorities.

The Raj Niwas said, "Shri VK Saxena @LtGovDelhi has expressed grave concern over reports based on statements by Ministers & AAP leaders alleging non provision of insulin to Hon'ble CM Shri Arvind Kejriwal who is in jail & purported "conspiracies" against him.

"Shri Saxena has asked DG Prisons to submit a factual and comprehensive report on the matter within 24 hrs. Although Prisons as a transferred subject comes directly & totally under the AAP Govt, LG has assured that no laxity with regards to CM"s health will be tolerated," Raj Niwas said in a series of posts on X.

At a presser conference, Atishi claimed that the chief minister's requests for insulin have been denied by the Tihar jail administration, and attempts to arrange a video conference with his doctor are facing opposition from the ED and the prison officials.

"For the past several days, his blood sugar level has been consistently above 300 mg/dL," Atishi claimed.

"Despite Arvind Kejriwal's repeated requests, he is not being given insulin, and his sugar level is increasing. He is not being given medication because there is a plot to kill him," she alleged.

# 5 Common Mistakes That Might Ruin Your Homemade Kulfi

Whenever someone mentions the word 'kulfi', it instantly makes us nostalgic. It's a dessert that we've all grown up eating and have fond memories of. Whether during lunch break in school or in the evenings from the vendor roaming around in your neighbourhood, our love for kulfi has no bounds.

Even today, we find comfort in indulging in one, especially during the summer season. There are many people who prefer to make it at home instead of buying it from the market. However, the results may not always be satisfactory. Your kulfi may not be firm enough or may lack the creamy texture you desire. If you're planning to make kulfi anytime soon, here are some mistakes you must watch out for:

**Here Are 5 Mistakes To Avoid While Making Kulfi At Home:**



1. Not using the right type of milk : The type of milk you use to make your kulfi makes a huge difference. Since it is the key ingredient, there's no way you can compromise on it. If you want your kulfi to turn out perfectly, you must use milk with a high fat content. This will ensure that it is rich in flavour and perfectly creamy, making it more indulgent.
2. You overcook the milk : Making the perfect kulfi also involves cooking the milk just right. Always cook it over a low-medium flame to maintain better control. The goal is to simmer it until it reaches a boil. If you continue simmering it for a long time, the milk will naturally overcook, which can have a drastic impact on its texture. If you use this overcooked milk, your kulfi will have a grainy texture.
3. Not being generous with the flavourings : The most exciting part about making kulfi is the flavourings. After all, they are what make it taste more divine. So, you must be as generous as you can here. If you compromise or hesitate, your kulfi won't be as flavourful. It'll certainly taste good, but lack that element of the ones you get at ice cream shops. Pistachios, almonds, kesar strands are some that you must consider adding.
4. Using incorrect mould size : Once you've prepared the kulfi, it needs to be poured into moulds. However, many people end up using the incorrect mould size. Ensure that the moulds that you are using are large enough to accommodate all your kulfi mixture. Never overfill them and always leave some room at the top to prevent creating a mess in the freezer.
5. Not being mindful of freezing time : You must also be mindful of how much time you let your kulfi freeze. Kulfi should freeze only until its firm enough. This would take you anywhere between 5 to 6 hours. If you leave it for longer, there is a high chance it'll become too hard and even develop ice flakes on top. And this is something we want to avoid at all costs. On the other hand, don't freeze it for less time as well, or it'll be to soft and melt quickly.

With our easy tips, you'll be able to whip up perfectly creamy kulfi in the comfort of your kitchen.

## पर्यटकाचा डोहात पाय घसरून मृत्यू

**जव्हार** : काळमांडवी धबधब्यावर आलेल्या पर्यटकांपैकी एक तरुण डोहात पोहण्यासाठी उतरत असताना अचानक पाय घसरून मृत्यू झाल्याची घटना बुधवारी दुपारी २ च्या सुमारास घडली. हर्षद वाघुल (२२, रा. नाशिक) असे मृताचे नाव आहे. त्याच्या सोबत अन्य काही जण होते. बुडालेल्या हर्षदला काढण्यापूर्वी त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली. नंतर स्थानिकांनी जव्हार पोलीस ठाण्यात फोन करून कळवले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदन अहवालासाठी उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथे पाठवला आहे.

# समन्वयाअभावी कल्याणच्या वाहतुकीची घुसमट

### ढिसाळ नियोजनामुळे सॅटीसचे काम कासवगतीने सुरू । वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा

**कल्याण** : कल्याण स्टेशन परिसरात स्मार्टसिटी अंतर्गत सुरू असलेले सॅटीस प्रकल्पाचे काम ढिसाळ नियोजनामुळे कासवगतीने सुरु आहे.वाहतूक पोलीस, आरटीओ, महापालिका, रेल्वे प्रशासन यांच्यात समन्वय नसल्याने शहरातील प्रमुख चौकात दररोज प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून स्टेशन परिसरात तर वाहतूक व्यवस्थेचा संपूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र कल्याणकरांना दररोज अनुभवयास येत आहे.



स्मार्ट सिटी अंतर्गत कल्याण स्टेशन परिसर सुधारणा प्रकल्प म्हणजेच सॅटीस उड्डाणपुल उभारण्याचे काम पाच वर्षापूर्वी सुरू करण्यात आले. मात्र नियोजनाच्या अभावामुळे हे काम अत्यंत संथगतीने सुरु आहे. या कामासाठी वाहतुक पोलिसांनी परिपत्रक जारी करुन वाहतूक व्यवस्थेत बदल केले. मात्र प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणी होत नसल्याने वाहतूक व्यवस्थाच कोलमडली आहे. सॅटीसच्या कामामुळे एसटी डेपो विठ्ठलवाडी येथे स्थलांतरीत करण्यात आला. त्यामुळे एसटी बसेसची वाहतूक सॅटीसचे काम पूर्ण होईपर्यंत प्रेम ऑटो, दुर्गाडी चौक, एपीएमसी मार्केट मार्गे होणे व शहराच्या बाहेरच तात्पुरते बसथांबे करणे आवश्यक होते. मात्र बसडेपो स्थलांतरीत करुनही लांब पल्ल्याच्या सर्वच बसेस स्टेशन परिसरात येत असल्याने शहरातील वाहतूक मार्गावर ताण येऊन प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. सॅटीसचे प्रत्यक्ष काम सुरु असलेल्या दिपक हॉटेल ते शिवाजी चौक, महात्मा फुले चौक, साधना हॉटेल,भानु - सागर रोड, बैलबाजार ह्या वाहतुकीच्या भर रस्त्यावर खाद्यपदार्थ विक्रीच्या हातगाड्या, टपऱ्या, फेरीवाल्यांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केल्यामुळेही रहदारीस अडथळे येत आहेत.एसटी स्टॅण्ड समोरील प्रवाशांची प्रचंड वर्दळ असलेला रेल्वे हद्दीतील ३० वर्ष जुना रिक्षा स्टॅन्ड कोरोना काळात रेल्वेने कायमस्वरुपी बंद केला. रेल्वे आणि पालिकेने पर्यायी रिक्षा स्टॅण्डची व्यवस्था न केल्याने सद्यस्थितीत सर्वच रिक्षा रस्त्यावर उभ्या आहेत. काही महिन्यांपूर्वी एसटी स्टॅण्ड समोरील रहदारीचा रस्ताही सॅटीसच्या पुढील कामाकरता बंद करण्यात आला. त्यामुळे तेथील सर्व रिक्षा वाहतूकही साधना हॉटेल येथील वर्दळीच्या रस्त्यावर आली आहे. रिक्षा संघटनेने पर्यायी रिक्षा स्टॅण्ड करता दोन - तीन ठिकाणी जागा सुचवूनही रेल्वे व पालिका प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले.

त्यातच भिवंडी, पडघा, शिळडेग व श्रीमलंग परिसरात जाणाऱ्या शेकडो काळी पिवळी ओम्नी टॅक्सी रहदारीचा रस्ता व्यापून उभ्या राहतात. विना लायसन्स बॅच चरसी, गर्दुल्ले, नशेबाज अल्पवयीन रिक्षा ड्रायव्हर यांचाही उपद्रव वाढला असून त्यांचाही रहदारीस अडथळा होत आहे. अवैध वाहने आणि अपप्रवृत्तीच्या रिक्षाचालकांवर वाहतूक पोलिसांचे नियंत्रण नाही. बेशिस्त वाहतुकीमुळे नागरिकांना रिक्षा प्रवासाकरता तासनतास ताटकळत उभे रहावे लागते. गर्दीच्या वेळी तर महिला व ज्येष्ठ नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. स्टेशन परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यास लोकप्रतिनिधीसह राजकीय पक्षही उदासिन असल्याने प्रवाशी,नागरिकांच्या नाराजीचा फटका निवडणूकीत बसण्याची चर्चा व्यक्त केली जात आहे.

#### रिक्षाचालक-प्रवाशांमध्ये रोजचाच संघर्ष

रिक्षाचालक आणि प्रवाशांमध्ये तू तू, मैं मैं वाद व भांडणे हे आता रोजचेच झाले आहेत. यात प्रामुख्याने प्रवासी घेण्यावरुन रिक्षाचालक आणि काळीपिवळी ओम्नीचालकांमधील रोजच्या संघर्षाचे पर्यवसान हाणामारीत होऊन एखाद्याचा जीव जाण्याचीही शक्यता निर्माण झाली आहे. दोन दिवसापूर्वीच चारपाच ओम्नी टॅक्सीचालकांनी स्टेशन परिसरात रिक्षाचालकास बेदम मारहाण केली होती. प्रवाशांनीच वेळीच हस्तक्षेप करुन त्याला वाचवले. यामध्ये गंभीर दुखापत झालेल्या रिक्षाचालकास कल्याण पूर्वेतील जनकल्याण हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात येत आहेत. याप्रकरणी फरार ओम्नीचालकांविरोधात महात्मा फुले पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

#### या उपाययोजना करणे आवश्यक

पालिका आयुक्तांनी स्टेशन परिसरात पाहणी करुन स्मार्टसिटी, रेल्वे पालिका, आरटीओ, वाहतूक पोलिस यांची संयुक्तिक बैठक घ्यावी, सॅटीसच्या कामाची गती वाढवावी, रिक्षा वाहतूक नियोजन करावे, स्टेशन परिसर व साधना हॉटेल येथे वाहतूक नियमनाकरता पूर्ण वेळ तसेच गर्दीच्या वेळेस वाहतूक पोलिसांची नेमावेत, काळी पिवळी ओम्नीटॅक्सीवर नियंत्रण आणावे, स्टेशन परिसरात भिवंडीतील रिक्षा, खाजगी कार, जीपच्या अवैध प्रवासी वाहतुकीस प्रतिबंध करावा, वाहतूक कोंडी विरहीत सुरक्षित वाहतूक व्यवस्थेकरता नागरिकांच्या तक्रारीचे तत्काळ निराकरण करावे.

## पैसे कमावण्याचे आमिष दाखवून गंडा

**भिवंडी** : सध्या ऑनलाईन फसवणूकीचे प्रमाण वाढले आहे. असे असताना अधिक पैसे कमावण्याच्या अमिषाला बळी पडलेल्याची संख्या वाढत आहे. अशाच ऑनलाईन पद्धतीने भिवंडीतील एका नागरिकाला एक लाख रुपयांची फसवणूक केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे.याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.भिवंडी शहरातील शांतीनगर परिसरात राहणारा सचिन कुमार अरुण तिवारी यास एका मोबाईल वरून संपर्क साधणाऱ्या दोघा जणांनी ऑनलाईन द्वारे पैसे कमविण्याचे आमिष दाखवुन विश्वास संपादन करून वेगवेगळी कारणे सांगून त्यास आपल्या बँक खात्यावर एक लाख १० हजार रुपये भरण्यास प्रवृत्त करून फिर्यादीची आर्थिक ऑनलाईन फसवणुक केली आहे.या प्रकरणी सचिन तिवारी यांनी दिलेल्या तक्रारी वरून शांतीनगर पोलिस ठाण्यात दोघा अज्ञात आरोपीं विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भंगारातील बसचा परिवहन सेवा ऑनलाईन पद्धतीने करणार लिलाव

**ठाणे** : ठाणे परिवहन सेवा त्यांच्या नादुरुस्त १७ साध्या बस लिलावत काढून त्याद्वारे उत्पन्न मिळवणार आहे. यापूर्वीही मुदत संपलेल्या ठाणे परिवहन सेवेच्या बसचा ऑनलाईन पद्धतीने लिलाव करून विक्री करण्यात आली होती.त्यातून परिवहन सेवेला ५ कोटी ८२ लाख रुपयांचा नफा झाला होता . या रक्कमेतून परिवहन सेवेने सीएनजी वर चालणाऱ्या बस विकत घेतल्या होत्या.

सर्वसामान्य ठाणेकर जनतेचा प्रवास सुखकारक व्हावा याकरता ठाणे परिवहन सेवा सुरु करण्यात आली होती.पण पुढे या सेवेवर टीकाच जास्त होवू लागली. अनेक समस्यांनी या सेवेला ग्रासले आहे.नादुरुस्त बसेस त्यांची योग्यरीतीने न केलेली दुरुस्ती कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा त्यांच्यावर प्रशासनाचा नसलेला अंकुश या आणि इतर कारणांनी ही परिवहन सेवा नेहमीच वादात राहिली आहे आजच्या घडीला ठाणे शहराची लोकसंख्या २२ लाखांच्या घरात गेली असताना टिएमटीच्या ताफ्यात पुरेशा बसगाड्या नाहीत. त्यामुळे प्रवाशांना खासगी बस आणि रिक्षांचा आधार घ्यावा लागत आहे. या समस्येवर उपाय म्हणून परिवहन सेवेने काही पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. याचाच भाग म्हणून ठाणे परिवहन सेवेच्या ताफ्यात इलेक्ट्रिक बस दाखल झाल्या आहेत.तर यापूर्वी टीमटीच्या तब्बल १५३ बस ज्या कळवा आणि वागळे आगारात पडून होत्या.या नादुरुस्त भंगारातील बसेसच्या लिलावाची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या लिलाव प्रक्रियेत दिल्ली, मुंबई, हैद्राबाद, बंगळूरू आदी शहरातील व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला होता.या प्रक्रियेतून ५कोटी ८२ लाख इतकी रक्कम ठाणे परिवहन सेवेला प्राप्त झाली. ही रक्कम निश्चित किंमती पेक्षा तब्बल चारपट अधिक होती. परिणामी या जुन्या बसेसच्या विक्रीतून ठाणे परिवहन सेवेला सुमारे चार कोटींचा फायदा झाला.या रक्कमेचा योग्य तो ठाणेकर नागरिकांसाठी फायदा करायचा या उद्देशाने परिवहन सेवेने पावले उचलली आहेत. याचा भाग म्हणून या रक्कमेतून सीएनजीवर चालणाऱ्या बस विकत घेतल्या होत्या. ठाणे परिवहन सेवेच्या ताफ्यात सद्यस्थितीत एकूण ५४६ बस आहे.

यातील ९४ जुन्या बसेस टीएमटीच्या मालकीच्या तर, ११५ एसी, ११० स्टँडर्ड, ९० मिडी बसेस, 'जेएनयूआरएम' मधील नवीन आणि जुन्या ४५ बसेस, ५० महिला तेजस्विनी बसेस अशा एकूण ४१० बसेस भाडेतत्त्वावर आहेत .यातील परिवहनच्या मालकीपैकी १७ बस नादुरुस्त अवस्थेत असल्याने भंगारात जमा झाल्या आहेत .या १७ बसचा ऑनलाईन पद्धतीने लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मधील सूत्रांनी दिली आहे. त्यामाध्यमातून परिवहन सेवा उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न करणार आहे .

## उल्हासनगरात महापालिका कॉन्ट्रॅक्टरवर प्राणघातक हल्ला

**उल्हासनगर** : राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता तथा महापालिका कॉन्ट्रॅक्टर विशाल माखिजा याच्यावर १२ जणांच्या टोळीने जीवघेणा हल्ला केल्याची घटना सायंकाळच्या सुमारास घडली आहे.या घटनेने नंतर हल्लेखोरांनी गाड्यांची तोडफोड केली आहे.याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात पुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. विशाल माखीजा हे उल्हासनगर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष भारत गंगोत्री यांचे निकटवर्ती आहेत. विशाल माखिजा यांचे कॅम्प ४ मधील दहा चाळ जवळील सेन्टर पार्क हॉटेल जवळील रस्त्याची पाहणी करत होते. त्याच दरम्यान हॉटेल मध्ये बसलेल्या १२ जणांच्या टोळीने विशाल माखिजा याला शिवीगाळ करत दगडफेक केली. त्याला माखिजा यांनी प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. मात्र टोळक्याने दगडफेक सुरू केल्याने माखिजा आणि त्यांच्या सहकाऱ्याना तिथून काढता पाय घ्यावा लागला. असे असले तरी टोळक्याने मागे पाठलाग करून



दगडफेक केली. एवढेच नाही तर माखिजा यांच्या डोक्यात काचेची बाटली देखील फोडण्यात आली आहे. या टोळक्याने कन्स्ट्रक्शन साईडवरील फावडा आणि टिकाव यांच्या साह्याने कामगाराना मारहाण करुन मिक्सरची तोडफोड केली. याच ठिकाणी माखिजा यांच्या गाडीची तोंडफोड केली.दरम्यान या हल्ल्याचे कारण अद्याप समजू शकले नाही. हल्लेखोर मात्र फरार झाले आहेत. सद्या जखमी विशाल माखिजा वर शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचार करून त्यांना खाजगी रुग्णालयात घालवण्यात आले आहे. पोलिसांनी घटनास्थळी बंदोबस्त वाढवला असून हल्लेखोरांचा शोध पोलिसांनी सुरु केला आहे.

## वसई-विरारमधील धोकादायक इमारतींचा प्रश्न ऐरणीवर

### अद्याप जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण झाले नसल्याने नागरिक हवालदिल

**नालासोपारा** : वसई विरार महापालिकेच्या हद्दीतील धोकादायक व अतिधोकादायक इमारतींचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वसई विरार नालासोपारा शहरात अनेक इमारती धोकादायक स्थितीत आहेत. काही इमारती अतिधोकादायक आहेत. दरवर्षी पालिका धोकादायक इमारती घोषित करून त्यांना नोटिसा बजावते. त्यापैकी काही इमारती तोडण्यात आल्या, पण काही धोकादायक इमारती अजूनही उभ्या आहेत. त्या कधीही पडण्याच्या स्थितीत आहेत. अशा धोकादायक इमारतींना नोटिसा पाठवून पालिकेने आपली जबाबदारी पार पाडली आहे. पावसाळ्यात एखादी अप्रिय घटना घडून काही जीवितहानी झाली तर आम्ही नोटीस पाठवली होती, असे बोलण्यास पालिका व अधिकारी मागे पडणार नाही, एवढे मात्र खरे ! वसई विरार शहरात शेकडो इमारती आहेत. ज्या अतिशय जुन्या व जीर्ण झालेल्या आहेत. या मोडकळीस आलेल्या इमारतींमधून अपघात होऊ शकतात. मुसळधार पावसात कधीही कोसळणाऱ्या अशा अनेक इमारती आहेत. जीर्ण इमारतींमुळे निर्माण होणाऱ्या धोक्याबाबत पालिका अधिकारी गंभीर नसल्याचे नागरिक सांगतात.



#### मूलभूत सार्वजनिक कामे ठप्प

निवडणूक आयुक्तांनी सर्व अधिकाऱ्यांची ड्युटी निवडणुकीत लावल्याचे येथील संबंधित अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे . त्यामुळे या कामात व्यत्यय येत आहे . ३० लाख लोकसंख्या असलेल्या पालिकेतील प्रत्येक अधिकारी निवडणूक ड्युटीवर रुजू झाल्यामुळे मूलभूत सार्वजनिक कामे ठप्प झाली आहेत . दरम्यान पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सर्व विभागीय अधिकाऱ्यांना आपापल्या भागातील मोडकळीस आलेल्या इमारतींचे सर्वेक्षण करण्यास सांगण्यात आले आहे, असे पालिका अधिकाऱ्यांनी सांगितले .

## औद्योगिक वसाहतीतील लॉजमध्ये देहविक्रयाचा व्यवसाय?

**बोईसर** : तारापूर येथील अणुशक्ती केंद्रामुळे जगप्रसिद्ध औद्योगिक वसाहत म्हणून ओळख असलेल्या बोईसर शहरासह परिसरातील ग्रामपंचायती, तसेच वसाहतीच्या शहराला जोडणाऱ्या सर्व रस्त्यांलगत असणाऱ्या लॉजमधून बेकायदा वेश्याव्यवसाय खुलेआम सुरू आहे. तारापूर एमआयडीसी परिसरातील एका हॉटेलवर छापा टाकून पोलिसांनी बेकायदा वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी दोन जणांना अटक करून तीन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.



एमआयडीसीत येणाऱ्या व्हिझिटर्स, तसेच इतर कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना राहण्याच्या सोयीसाठी शेकडो हॉटेल्स, लॉज आहेत. मात्र या लॉजच्या माध्यमातून अनेक ठिकाणी छुप्या पद्धतीने अवैध वेश्याव्यवसाय चालू असल्याच्या चर्चा स्थानिक नागरिकांकडून होत आहेत. स्थानिक पोलीस प्रशासन विभागाकडून यावर कोणतेही कारवाई न करता केवळ बघ्याची भूमिका घेतली जात असते. त्यामुळे सामान्य नागरिकांतून नाराजी व्यक्त केली जात आहे.

## वसुलीप्रकरणी दोघींवर गुन्हा




**ठाणे** : गाडी खरेदीच्या अंतर्गत झालेल्या पैशाच्या वसुलीसाठी आता महिलांचा वापर करण्यात येत असल्याचे चित्र कासारवडवली पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यांवरून स्पष्ट होत आहे. नुपुर पाटील यांच्या घरात दोन महिला शिरल्या आणि पैसै देण्यासाठी त्यांना शिवीगाळ सुरू केली. नुपुर यांनी पोलिसांना बोलवत दोघां विरोधात गुन्हा दाखल केला.

# लघु पाटबंधारेच्या निकृष्ट कामांना अभय?

### प्रशासन आणि अधिकारी वर्ग ठेकेदाराला पाठीशी घालत असल्याचा आरोप

**मोखाडा** : मोखाडा तालुका पाणीटंचाईत अन्य तालुक्यांपेक्षा अव्वलस्थानी आहे. माणसाप्रमाणे मुक्या जनावरांनासुद्धा पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. पाणी टंचाईची दाहकता कमी करण्यासाठी तालुक्यात बरेच लहान-मोठे बंधारे लघु पाटबंधारे विभागाकडून बांधण्यात आले आहेत. त्यापैकी जामद्याचापाडा गावा जवळील नदीवर सन २०२०-२१ मध्ये लोखंडी दरवाजे असलेला बंधारा बांधण्यात आला. या बंधाऱ्यातून नागरिकांना आपल्या सोयीनुसार पाणी साठवणे व पाणी सोडण्याची सोय करून देण्यात आली. परंतु येथे अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभारामुळे ठेकेदाराने बंधाऱ्याला लोखंडी दरवाजे लावले नाहीत. हा बंधारा जुना असला तरीसुद्धा निकृष्ट



कामांना अधिकाऱ्यांचे अभय कसे मिळते, याचे नागरिकांमधून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी व्हावी, यासाठी लघु पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून दरवर्षी नवीन बंधारा व जुन्या बंधाराची दुरुस्ती करण्यासाठी कोट्यवधींचा निधी मंजूर केला जातो. यातील बरेचशे बंधारे हे जिल्हा परिषद सदस्य, इतर लोकप्रतिनिधी,त्यांचे कार्यकर्ते यांचे असतात. यामुळे बंधाऱ्यांची कामे करताना कामांचा दर्जा घसरतो आणि अधिकारीसुद्धा कामाची गुणवत्ता तपासत नाहीत. त्यामुळे बोगस काम करताना अधिकारीच या बोगस कामांना अभय देत असावेत, अशी शंका उपस्थित होत आहे. असाच काहीसा प्रकार तालुक्यापासून ७ ते ८ किमी अंतरावर असलेल्या जामद्याचापाडा गावा जवळील बंधाऱ्याबाबत घडला आहे. सन २०२० ते २१ मध्ये गावानजीकच्या नदीवर ३० ते ३५ मीटर लांबीचा लोखंडी दरवाजे असलेला बंधारा बांधण्यात आला. परंतु बंधारा बांधकाम पूर्ण होऊनसुद्धा बंधाऱ्याच्या दरवाजांना ठेकेदाराने लोखंडी गेट बसवले नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

तालुक्यात अशा प्रकारचे असंख्य बंधारे आहेत की, ज्या बंधाऱ्यांची बांधकामे पूर्ण झाली. मात्र त्याचा काहीएक फायदा होताना दिसत नाही. केवळ शासनाकडून कोट्यवधींचा निधी मंजूर करायचा आणि बोगस कामे करून निधी हडप करायचा, असा काहीसा प्रकार सर्रास सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे.

- पावसाळ्यात नदीपात्रातून पाणी ओसंडून वाहत असले तरीदेखील दरवाजांना लोखंडी गेट नसल्याने पाणी अडवता येत नाही . यामुळे दरवाजांना असलेले लोखंडी गेट नेमके कुठे गेले? असा प्रश्न उपस्थित होत आहे . बंधारा बांधण्यामागचा हेतू मात्र असफल होताना दिसत आहे .
- नवीन बांधलेले बंधारे जिल्हा परिषद सदस्य, आमदार, खासदार यांचे असतात . तर काही त्यांच्या कार्यकर्त्यांचे असल्याची माहिती लघु पाटबंधारे विभागाचे प्रभारी उपअभियंता अजित पाटील यांनी भ्रमणध्वनीवरून बोलताना दिली .

# अमली पदार्थ विक्रीचे रॅकेट सक्रिय

### एमडी पावडर विक्री करणारे तीनजण अटकेत

**उल्हासनगर** : आचारसंहिता सुरू असून लोकसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने हद्दीतील अवैध शस्त्रे व अमली पदार्थ यांचा शोध घेवून त्यावर कारवाई करण्याचे आदेश हे ठाणे पोलीस आयुक्तालयाकडून पोलिसांना देण्यात आले आहेत. त्यामुळे रात्री गस्त घालत असताना मध्यवर्ती पोलिसांनी एमडी ड्रग्ज विकणाऱ्या तीन आरोपींना अटक केली आहे.

११ एप्रिल रोजी मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अमंलदार यांना सुचना देवून परिसरात गस्त घालण्यासाठी रवाना करण्यात आले होते. ते हद्दीत गस्त घालत असतांना रात्रीच्या सुमारास उल्हासनगर कँप ३ येथील वेदांता कॉलेज बॉक्स क्रिकेट ग्राउंडच्या गेट समोर, उदयोग विहार



कंपनीच्या कंपाउंडच्या बाजूला, विठ्ठलवाडी स्टेशन रोड या ठिकाणी एक व्यक्ती मोटार सायकलवर थांबून पोलीसांना पाहून कावरा-बावरा झाल्याचे पोलिसांना दिसले. त्याच्यावर पोलिसांचा संशय आल्याने पोलिसांनी त्याला शिताफीने पकडुन त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव आकाश प्रेम पंजवाणी सांगितले. आकाशची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एकूण १० ग्रॅम वजनाची एमडी पावडर हा अंमली पदार्थ मिळून आल्याने अंमली पदार्थ तो विक्री करण्याकरता आले असल्याचे सांगितले. त्याच्याकडून नमूद अंमलीपदार्थ व होंडा ॲक्टीव्हा सह एकुण १,९२,५००/- रू किमंतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. आकाशला अटक करून त्याच्या विरोधात मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## डहाणूत दूषित पाणीपुरवठ्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात



**डहाणू** : डहाणू नगरपरिषद हद्दीत चार-पाच दिवसांपासून सरावली, रामवाडी, पेट्रोल पंप परिसरातील रहिवाशांना गढूळ व दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक त्रस्त आहेत. नगर परिषदेच्या आरोग्य विभागाने दुरुस्ती केली असली तरी अद्याप काही भागात पुरेशा प्रमाणात पाणी येत नाही. तर पिण्याच्या पाण्याला प्रचंड दुर्गंधी येत असल्याची तक्रार करण्यात येत आहे. डहाणूच्या सरावली सावटा जवळील क्रीडा शाळेजवळ साखरे धरण येथून नगरपरिषदेच्या जलशुद्धीकरण केंद्राकडे येणारी मुख्य जलवाहिनी चार दिवसांपूर्वी फुटली. डहाणू शहराला होणाऱ्या पाणीपुरवठ्यात व्यत्यय येऊन ठिकठिकाणी पुरेशा प्रमाणात पाणी आले नाही. तर सरावली, रामवाडी, पेट्रोल पंप परिसरातील नागरिकांना गढूळ व दूषित पाणीपुरवठा झाला. तीन-चार दिवसांपासून मातीमिश्रित, दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत ग्रामस्थांनी नगर परिषदेला तक्रार केली. दरम्यान, नगरपरिषद प्रशासनाने युद्ध पातळीवर १५ एप्रिल रोजी दुरुस्ती केली आहे, असे डहाणू नगरपरिषद आरोग्य विभाग प्रशासनाने सांगितले.

## ईव्हीएम मशिन्सचे प्रथमस्तरीय सरमिसळ

### जिल्हा निवडणूक अधिकारी बोडके यांची माहिती

**पालघर** : भारत निवडणूक आयोगाकडून लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम १६ मार्च रोजी घोषित केला. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता पालघर जिल्ह्यातील २२ पालघर (अ.ज.) या लोकसभा मतदारसंघासाठी ईव्हीएम मशिन्सचे प्रथमस्तरीय सरमिसळ (कोणताही गैरव्यवहार टाळण्यासाठी अशी सरमिसळ करण्यात येते.) करण्यास मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी मान्यता दिली आहे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी गोविंद बोडके यांनी सांगितले.

भारत निवडणूक आयोगाचे निर्देशानुसार पालघर जिल्ह्यात १५ एप्रिल ते २० एप्रिलपर्यंत प्रथमस्तरीय सरमिसळ केली जाणार आहे. त्याअनुषंगाने १५ एप्रिल रोजी बीयू, सीयू , व्हीव्हीपॅटची पहिली सरमिसळ मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली.

यावेळी भारत निवडणूक आयोगाकडील सूचनेनुसार



प्रथमस्तरीय सरमिसळ बीयू, सीयू, व्हीव्हीपॅटची अधिकृत प्रक्रिया इएमएस या ऑनलाइन सॉफ्टवेअरबाबत थोडक्यात माहिती देण्यात आली. मशिनची सरमिसळ कशी केली जाते, याची माहिती देण्यात आली.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रथम सरमिसळनुसार विधानसभा मतदारसंघ निहाय ईव्हीएम मशिन्स वाटप करण्याच्या अनुषंगाने नंडोरे येथील गोदामात कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली, असे बोडके यांनी सांगितले. दरम्यान कोणते बीयू, सीयू, व्हीव्हीपॅट कोणत्या विधानसभा मतदारसंघास जाणार आहेत हे निश्चित होते.

तर द्वितीय सरमिसळमध्ये कोणते बीयू, सीयू, व्हीव्हीपॅट कोणत्या मतदान केंद्रावर जाणार आहे, हे कळते. ही प्रक्रिया अतिशय पारदर्शी होत असल्याने शंका उत्पन्न होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. तसेच ईव्हीएम मशिन राखीव ठेवण्यात येतात. मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशिनमध्ये बिघाड झाल्यास किंवा बंद पडल्यास संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत ईव्हीएम मशिन मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर पाठवल्या जातात, असे बोडके यांनी स्पष्ट केले.